SAMPLE CONTENT

# मराठी युवकभारती

# MODEL QUESTION PAPER SET

**With Solutions**

**Based on Latest Paper Pattern**

**10 Activity Sheets**

**+ Board Question Paper March 2023**



**Std. XII**

**Target Publications® Pvt. Ltd.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांद्वारे निर्धारित पाठ्यपुस्तकावर आधारित

# मराठी युवकभारती

# Model Question Paper Set

With Solutions

## STD. XII

**ठळक वैशिष्ट्ये**

- बोर्डाच्या अद्ययावत कृतिपत्रिका आराखडा व पाठ्यक्रमावर आधारित
- १० नमुना कृतिपत्रिकांचा त्यांच्या उत्तरपत्रिकांसहित समावेश
- मार्च २०२२ ची बोर्ड कृतिपत्रिका तिच्या उत्तरपत्रिकेसह समाविष्ट
- बोर्ड कृतिपत्रिकेचे प्रारूप अंतर्भूत
- बोर्ड कृतिपत्रिकेच्या प्रारूपाचे सविस्तर विवेचन समाविष्ट

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

P.O. No.5300

TEID: 2424

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

बारावी म्हणजे जीवनाला खऱ्या अर्थाने कलाटणी देणारे वर्ष. भविष्याची वाट निर्धारित करणारा शैक्षणिक प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे, साहजिकच अनेक विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेबाबत चिंतीत आणि भयभीत असतात.

विद्यार्थ्यांच्या मनातील ही भीती दूर करणे अवघड असले तरीही ते त्याहून कैक पटींनी महत्त्वपूर्णही आहे; कारण या भीतीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास डगमगतो. 'परीक्षा हा चिंतेचा नाही, तर चिंतनाचा विषय आहे.' हे सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी जाणले पाहिजे. मराठी या भाषा विषयात अधिकाधिक गुण मिळवणे वरकरणी जरी अवघड वाटत असले तरीही ते अशक्य मात्र मुळीच नाही. या साऱ्याचा विचार करून विद्यार्थ्यांची चिंता दूर करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागृत करण्यासाठी टार्गेट प्रकाशनाने **मराठी युवकभारती Model Question Paper Set With Solutions: Std. XII** या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

कृतिपत्रिकांचा अधिकाधिक सराव ही परीक्षेची उत्तम तयारी करण्याची सरळ आणि अचूक पद्धत मानली जाते. हे तथ्य जाणून या पुस्तकामध्ये मागील वर्षाची बोर्ड कृतिपत्रिका आणि १० नमुना कृतिपत्रिका देण्यात आल्या आहेत. या कृतिपत्रिकांची निर्मिती बोर्डाचा अद्ययावत कृतिपत्रिका आराखडा व नवीन पाठ्यक्रम यावर आधारित आहे. कृतिपत्रिका सोडवल्यानंतर स्वत:चे मूल्यमापन करणेही तेवढेच आवश्यक असते. यातून विद्यार्थ्यांना आपली परीक्षेची तयारी जोखता येते व स्वत:मध्ये चांगले परिवर्तन घडवता येते. याकरिता या सर्व कृतिपत्रिकांच्या आदर्श उत्तरपत्रिका यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या आधारे विद्यार्थी सहजगत्या स्वयंमूल्यमापन करू शकतील.

बोर्ड परीक्षेच्या पूर्वतयारीकरिता कृतिपत्रिकेचे प्रारूप समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. याच्या अभ्यासातूनच परीक्षेच्या तयारीकरिता विद्यार्थ्यांना योग्य दिशा प्राप्त होईल. हाच उद्देश नजरेसमोर ठेवून कृतिपत्रिका प्रारूपाचे त्यातील गुणांसह सविस्तर विवेचन देण्यात आले आहे. हे सहजगत्या समजून घेऊन प्रत्येक विभाग आणि त्या अंतर्गत येणाऱ्या कृती लक्षात घेऊन परीक्षेची तयारी सुगमरित्या करता येणे सहज शक्य होईल.

प्रयत्नांती परमेश्वर! चला ... नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोतच.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय **mail@targetpublications.org** या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी युवकभारती; पुनर्मुद्रण-२०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| बोर्ड कृतिपत्रिका प्रारूप - २०२२ | | १ |
| बोर्ड कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन | | ३ |
| **कृतिपत्रिका क्र.** | **कृतिपत्रिका पृष्ठ क्र.** | **उत्तरपत्रिका पृष्ठ क्र.** |
| १ | ७ | ७६ |
| २ | १३ | ९७ |
| ३ | १९ | ११० |
| ४ | २६ | १२३ |
| ५ | ३२ | १३५ |
| ६ | ३९ | १४८ |
| ७ | ४५ | १६१ |
| ८ | ५१ | १७२ |
| ९ | ५७ | १८४ |
| १० | ६३ | १९६ |
| बोर्ड कृतिपत्रिका: मार्च २०२२ | ६९ | २०८ |


Sample Content

Sample Content

# बोर्ड कृतिपत्रिका प्रारूप - २०२२

## घटकनिहाय गुणविभागणी

| घटक | गुण |
|---|---|
| गद्य | २० |
| पद्य | १६ |
| साहित्यप्रकार | १० |
| उपयोजित | १४ |
| व्याकरण व लेखन | २० |
| **एकूण** | **८०** |

### विभाग १ – गद्य **२० गुण**

(अपेक्षित कौशल्ये – आकलन, स्वमत, अभिव्यक्ती)

कृती १ अ) पठित गद्य पाठावर आधारित. (पठित उतारा १५० ते १८० शब्द)

१. आकलन कृती ०२ गुण

२. आकलन कृती ०२ गुण

३. स्वमत - अभिव्यक्ती कृती ०४ गुण

(स्वमत व अभिव्यक्ती यांवर आधारित प्रत्येकी एक कृती देणे, त्यांपैकी एक सोडवणे अपेक्षित.) **०८ गुण**

आ) पठित गद्य पाठावर आधारित. (पठित उतारा १५० ते १८० शब्द)

१. आकलन कृती ०२ गुण

२. आकलन कृती ०२ गुण

३. स्वमत - अभिव्यक्ती कृती ०४ गुण

(स्वमत व अभिव्यक्ती यांवर आधारित प्रत्येकी एक कृती देणे, त्यांपैकी एक सोडवणे अपेक्षित.) **०८ गुण**

इ) अपठित गद्य उतारा. (उतारा १०० ते १२० शब्द)

१. आकलन कृती ०२ गुण

२. आकलन कृती ०२ गुण

**०४ गुण**

### विभाग २ – पद्य **१६ गुण**

(अपेक्षित कौशल्ये – आकलन, अभिव्यक्ती, काव्यसौंदर्य, रसग्रहण)

कृती २ अ) पठित पद्य पाठावर आधारित. (संपूर्ण कविता देणे अपेक्षित.)

१. आकलन कृती ०२ गुण

२. आकलन कृती ०२ गुण

३. अभिव्यक्ती कृती ०४ गुण

**०८ गुण**

आ) पठित पद्य पाठावर आधारित. ('अ' कृतीसाठी दिलेली कविता सोडून.) ०४ गुण
काव्यपंक्तींचा अर्थ लिहिणे.
चार काव्यपंक्ती देऊन त्यातील अर्थ उलगडून दाखवणे.

इ) पठित पद्य पाठावर आधारित. ०४ गुण
('अ' आणि 'आ' कृतीसाठी दिलेल्या कविता सोडून उर्वरित कोणत्याही दोन कवितांवर कृती विचारणे व त्यांपैकी एक सोडवणे अपेक्षित.)

Sample Content

काव्यसौंदर्यावर आधारित कृती. (चार ते सहा काव्यपंक्ती देऊन.)

किंवा

रसग्रहणावर आधारित कृती. (चार काव्यपंक्ती देऊन.)

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा — १० गुण

(अपेक्षित कौशल्ये – आकलन, स्वमत, अभिव्यक्ती)

कृती ३ अ) कथा साहित्यप्रकार परिचय (सैद्धान्तिक) (पठित उतारा १२० ते १५० शब्द)

| | | |
|---|---|---|
| १. | य. आकलन कृती | ०१ गुण |
| | र. आकलन कृती | ०१ गुण |
| २. | आकलन कृती | ०२ गुण |
| | | **०४ गुण** |

आ) पठित कथांवर आधारित चार कृती देणे, त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित. प्रत्येक कथेवर १ स्वमत कृती व १ अभिव्यक्ती कृती असणे अपेक्षित.

| | | |
|---|---|---|
| १. | स्वमतावर आधारित दोन कृती | ०३ गुण |
| २. | अभिव्यक्तीवर आधारित दोन कृती | ०३ गुण |
| | | **०६ गुण** |

## विभाग ४ – उपयोजित मराठी — १४ गुण

(अपेक्षित कौशल्ये – आकलन, उपयोजन, कौशल्ये)

कृती ४ अ) उपयोजित घटकांवर आधारित आकलन कृती — ०४ गुण

१ ते ४ उपयोजित घटकांवर आधारित – प्रत्येकी २ गुणांसाठी चार आकलन कृती देणे, त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित.

आ) उपयोजित घटकांवर आधारित उपयोजन - कौशल्य कृती — १० गुण

१ ते ४ घटकांवर आधारित - प्रत्येकी ०५ गुणांसाठी उपयोजन व कौशल्य यांवर आधारित ०४ कृती देणे, त्यापैकी ०२ सोडवणे अपेक्षित.

## विभाग ५ – व्याकरण व लेखन — २० गुण

(अपेक्षित कौशल्ये – आकलन, उपयोजन, स्वमत, अभिव्यक्ती, भाषासौंदर्य)

कृती ५ अ) व्याकरण घटक व वाक्प्रचार

(व्याकरण घटक व वाक्प्रचार यांवर आधारित कृती देणे अपेक्षित.)

| | | |
|---|---|---|
| १. | वाक्यरूपांतर | ०२ गुण |
| २. | समास | ०२ गुण |
| ३. | प्रयोग | ०२ गुण |
| ४. | अलंकार | ०२ गुण |
| ५. | वाक्प्रचार | ०२ गुण |
| | | **१० गुण** |

(आ) निबंधलेखन - खालीलपैकी एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंधलेखन करणे अपेक्षित.
(पाचपैकी एक) — १० गुण

१. वर्णनात्मक निबंध
२. व्यक्तिचित्रणात्मक निबंध
३. आत्मवृत्तात्मक निबंध
४. कल्पनाप्रधान निबंध
५. वैचारिक निबंध

# बोर्ड कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन

## मराठी युवकभारती

**Time: 3 Hours** **Total Marks: 80**

**विभाग १ – गद्य** **२० गुण**

**पठित गद्य**

**कृती १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[८]**

- कृतिपत्रिकेत गद्य विभागात कृती १. (अ) मध्ये १५० ते १८० शब्दांचा एक पठित उतारा देण्यात येईल.
- या उताऱ्यावर ८ गुणांच्या कृती विचारण्यात येतील.
- उताऱ्यावर आधारित एकूण तीन कृती विचारल्या जातील.

**१. आकलन कृती** **२ गुण**

या अंतर्गत 'कृती करा', 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'एका शब्दात उत्तरे लिहा' अशा कृती विचारल्या जाऊ शकतात.

**२. आकलन कृती** **२ गुण**

या अंतर्गत 'जोड्या लावा', 'एका वाक्यात उत्तरे लिहा', 'सत्य असत्य ओळखा', 'योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा', 'घटनांचे परिणाम लिहा', 'कारणे लिहा', 'केव्हा घडले ते लिहा', इत्यादींवर आधारित कृती विचारल्या जाऊ शकतात.

**३. स्वमत-अभिव्यक्ती** **४ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारी, त्यांच्या विचारांची मांडणी जोखणारी, त्यांची मते शब्दांकित करायला वाव देणारी कृती येथे विचारली जाईल. याला विकल्प म्हणून विद्यार्थ्यांची आकलन क्षमता व आपल्या भाषेत अभिव्यक्त होण्याचे कौशल्य पडताळणारी अभिव्यक्ती कृती विचारण्यात येईल. स्वमत व अभिव्यक्ती यांवर आधारित प्रत्येकी एक कृती देण्यात येईल, त्यापैकी एक सोडवणे अपेक्षित असेल.

**लक्षात ठेवा-**

१. दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचा.
२. सर्व कृती समजून घ्या.
३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.

**कृती १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[८]**

- या कृतीच्या स्वरूपासाठी वर दिलेल्या कृती १. (अ) चे स्वरूप अभ्यासा.

**अपठित गद्य**

**कृती १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[४]**

- कृतिपत्रिकेत गद्य विभागात कृती १. (इ) मध्ये ४ गुणांसाठी साधारणत: १०० ते १२० शब्दांचा एक अपठित म्हणजेच पुस्तकाबाहेरील उतारा देण्यात येईल. येथे विकल्प देण्यात येणार नाही. यावर केवळ आकलन कृती विचारण्यात येतील. या ४ गुणांची कृतिनिहाय विभागणी व त्यात येणारे प्रश्नप्रकार समजून घेण्यासाठी वर दिलेल्या कृती १. (अ) मधील आकलन कृतींचे स्वरूप अभ्यासा.

Sample Content

## विभाग २ – पद्य

१६ गुण

**कृती २. (अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **[८]**

- कृतिपत्रिकेतील पद्य विभागात कृती २. (अ) मध्ये पाठ्यपुस्तकातील एक कविता देण्यात येईल. त्यावर ८ गुणांच्या कृती विचारण्यात येतील. यासाठी विकल्प देण्यात येणार नाही. या ८ गुणांची कृतिनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे:

**१. आकलन कृती** **२ गुण**

**२. आकलन कृती** **२ गुण**

या दोन्ही कृतींमध्ये 'आकृत्या पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'कोण ते लिहा', 'एका शब्दात उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडा', 'एका वाक्यात उत्तरे लिहा', '..... या आशयाची ओळ कवितेतून शोधून लिहा', 'कारणे लिहा', 'जोड्या जुळवा' इत्यादी वैविध्यपूर्ण कृती विचारण्यात येतील.

**३. अभिव्यक्ती कृती** **४ गुण**

विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीला व स्वभाषेत व्यक्त होण्याला चालना देणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

**लक्षात ठेवा-**

१. दिलेले पद्य दोन वेळा वाचा.
२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.
३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.

**कृती २. (आ) ओळींचा अर्थ लिहा.** **[४]**

- कृतिपत्रिकेतील पद्य विभागात कृती २. (आ) मध्ये ४ गुणांसाठी कृती विचारण्यात येईल. 'अ' कृतीसाठी दिलेली कविता सोडून इतर कोणत्याही कवितेतील चार काव्यपंक्ती देऊन त्यांचा अर्थ उलगडून दाखवणे येथे अपेक्षित असेल.

**कृती २. (इ) कोणतीही एक कृती सोडवा.** **[४]**

- कृतिपत्रिकेतील पद्य विभागात कृती २. (इ) मध्ये ४ गुणांसाठी दोन कृती विचारण्यात येतील. दिलेल्या कृतीपैकी कोणतीही एक कृती सोडवणे येथे अपेक्षित असेल. 'अ' आणि 'आ' कृतीसाठी दिलेल्या कविता सोडून उर्वरित कोणत्याही दोन कवितांवर कृती विचारणे व त्यांपैकी एक कृती सोडवणे अपेक्षित असेल.

**काव्यसौंदर्य**

यामध्ये कवितेच्या चार ते सहा काव्यपंक्ती देऊन त्यांचे आशयसौंदर्य, भावसौंदर्य, अर्थसौंदर्य उलगडणे अपेक्षित असेल.

**किंवा**

**रसग्रहण**

यामध्ये कवितेच्या चार काव्यपंक्ती देऊन त्यांचे रसग्रहण करणे अपेक्षित असेल.

Sample Content

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा

१० गुण

**कृती ३. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** [४]

कृतिपत्रिकेतील कृती ३ (अ) मध्ये पाठ्यपुस्तकातील कथा-साहित्यप्रकार परिचय (सैद्धांतिक) वर आधारित १२० ते १५० शब्दमर्यादेचा एक पठित उतारा देण्यात येईल. त्यावर आधारित दोन कृती येथे विचारल्या जातील. येथे कोणताही विकल्प देण्यात येणार नाही.

**१. य. आकलन कृती**
**र. आकलन कृती**

**२. आकलन कृती**
या दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'कृती करा', 'जोड्या जुळवा', 'एका वाक्यात उत्तरे लिहा', 'कारणे लिहा', 'चौकटी पूर्ण करा', 'योग्य की अयोग्य ते लिहा', 'योग्य पर्याय निवडा' इत्यादी स्वरूपाच्या कृती विचारण्यात येतील.

**कृती ३. (आ) (पठित कथांवर आधारित) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [६]

- कृतिपत्रिकेतील कृती ३. (आ) मध्ये पाठ्यपुस्तकातील कथांवर आधारित चार कृती विचारल्या जातील. त्यातील दोन कृती सोडवणे अपेक्षित आहे. प्रत्येकी ३ गुणांची एक स्वमत कृती आणि एक अभिव्यक्ती कृती विचारली जाईल.

## विभाग ४ – उपयोजित मराठी

१४ गुण

**कृती ४. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [४]

- कृतिपत्रिकेतील कृती ४. (अ) मध्ये पाठ्यपुस्तकातील १ ते ४ या उपयोजित घटकांवर आधारित चार आकलन कृती दिल्या जातील. त्यांपैकी कोणत्याही दोन कृती सोडवणे अपेक्षित असेल. यातील प्रत्येक कृती २ गुणांसाठी विचारली जाईल.

**कृती ४. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [१०]

- कृतिपत्रिकेतील कृती ४. (आ) मध्ये पाठ्यपुस्तकातील १ ते ४ या उपयोजित घटकांवर आधारित, उपयोजन व कौशल्य यांवर आधारित ४ कृती दिल्या जातील. त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित असेल. या कृतींकरिता दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उत्तरे लिहिणे अपेक्षित असेल. यातील प्रत्येक कृती ५ गुणांसाठी विचारली जाईल.

## विभाग ५ – व्याकरण व लेखन

२० गुण

**कृती ५. (अ) व्याकरण घटक व वाक्प्रचार** [१०]

- कृतिपत्रिकेतील कृती ५. (अ) मध्ये वाक्यरूपांतर, समास, प्रयोग आणि अलंकार या चार व्याकरण घटकांवर आणि वाक्प्रचारावर आधारित कृती विचारल्या जाऊ शकतील. यात समाविष्ट घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे:

  **१. वाक्यरूपांतर**
  यामध्ये 'वाक्यांचे प्रकार ओळखा', 'सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा', 'योग्य पर्याय निवडा' इत्यादी स्वरूपाच्या कृती विचारल्या जातील. यात प्रत्येकी १ गुणासाठी दोन कृती अथवा २ गुणांसाठी १ कृती विचारली जाऊ शकते.

Sample Content

**२. समास**

यामध्ये अव्ययीभाव समास, तत्पुरुष समास, विभक्ती तत्पुरुष समास, कर्मधारय समास, द्विगू समास, द्वंद्व समास व त्यांचे प्रकार, बहुव्रीही समास यांवर आधारित कृती विचारल्या जातील. यात 'समास ओळखा', 'सामासिक शब्दाचा विग्रह करा', 'सामासिक शब्द ओळखा', 'तक्ता पूर्ण करा' इत्यादी स्वरूपाच्या कृती विचारल्या जाऊ शकतील. यात १ गुणाच्या दोन कृती अथवा २ गुणांची १ कृती विचारली जाऊ शकते.

**३. प्रयोग**

यामध्ये कर्तरी, कर्मणी व भावे प्रयोग यांवर आधारित कृती विचारल्या जाऊ शकतील. यात 'प्रयोग ओळखा', 'योग्य पर्याय निवडा' इत्यादी स्वरूपाच्या कृती विचारल्या जाऊ शकतील. यात प्रत्येकी १ गुणाच्या दोन कृती अथवा २ गुणांची १ कृती विचारली जाऊ शकते.

**४. अलंकार**

यात अनन्वय अलंकार, अतिशयोक्ती अलंकार, अपन्हुती अलंकार, अर्थान्तरन्यास अलंकार यांवर आधारित कृती विचारल्या जातील. यात 'उपमेय ओळखा', 'उपमान ओळखा', 'अलंकार ओळखा', 'योग्य पर्याय निवडा' इत्यादी स्वरूपाच्या कृती विचारू शकतात. यात १ गुणाच्या दोन कृती अथवा २ गुणांची १ कृती विचारली जाऊ शकते.

**५. वाक्प्रचार**

यामध्ये 'वाक्प्रचाराचा अर्थ लिहा', 'वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा', 'वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या योग्य जोड्या जुळवा', 'योग्य पर्याय निवडा', 'वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा' अशा स्वरूपाच्या कृती विचारल्या जाऊ शकतील यात प्रत्येकी १ गुणाच्या दोन कृती अथवा २ गुणांची एक कृती विचारली जाऊ शकते.

**कृती ५. (आ) पुढीलपैकी एका विषयावर २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा.** **[१०]**

- कृतिपत्रिकेतील कृती ५. (आ) मध्ये वर्णनात्मक निबंध, व्यक्तिचित्रणात्मक निबंध, आत्मवृत्तात्मक निबंध, कल्पनाप्रधान निबंध, वैचारिक निबंध अशा ५ निबंधांचे विकल्प देण्यात येतील. या ५ निबंधांपैकी एक निबंध २०० ते २५० शब्दांत लिहिणे अपेक्षित असेल. या निबंधाकरिता १० गुण देण्यात येतील.

Sample Content

# नमुना कृतिपत्रिका : १

## मराठी युवकभारती

**Time: 3 Hours** **Total Marks: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना:**

(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.

(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग १ – गद्य [२०]

**कृती १. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

(१) कृती करा. (२)

**लेखकाच्या मते जीवन अर्थपूर्ण तेव्हा होते, जेव्हा** → ☐ → ☐

(२) चौकट पूर्ण करा. (२)

**लेखकाने सांगितलेली वाहन खरेदी करण्याची कारणे** → ☐ → ☐

कामापुरते आणि कामासाठी वाहन आणि आटोक्यात राहील एवढाच वेग, हे तंत्र अनुसरले, तर जीवन अर्थपूर्ण होईल. आपले जीवन अधिक प्रमाणात आपल्या वाट्याला यावे, ते कृतार्थतेने जगता, अनुभवता यावे, त्यासाठी उसंत लाभावी म्हणून वाहनांचा वापर करायला हवा. प्रत्यक्षात घडते ते वेगळे. इतरांशी मानसिक स्पर्धा करण्यासाठी, आपल्या ऐश्वर्याचे प्रदर्शन घडवण्यासाठी, गरज नसताना कर्ज काढून वाहने खरेदी करणारी माणसे समाजात आढळतात. कोणतेही महत्त्वाचे काम नसताना पत्नीला मागच्या बाजूला बसवून आधुनिक दुचाकीने सहज फेरफटका मारून आले म्हणजे अनेकांना बरे वाटते; पण आहेच वाहन तर चार-सहा मैलांवरचे एखादे निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहण्यासाठी ही माणसे का जात नाहीत? एखादा लक्ष्मी रोड, महात्मा गांधी मार्ग किंवा जंगली महाराज रस्ताच का पसंत केला जातो? देहू, आळंदी, सिंहगड, बनेश्वर, विठ्ठलवाडीकडचे रस्ते का दिसत नाहीत?

वाई, सातारा, फलटन, कराड अशा गावी वाहनांची एवढी निकड आहे का? शेतमळ्यात जायचे असेल, तर तातडीचा भाग म्हणून कधीतरी वाहन लागेल. आपले राहणे गावाबाहेर होत असेल, तर वाहनाचा उपयोग होईल; पण सहज आणि सुखाने येणे-जाणे सोडून वेगाने येरझारा कशासाठी घालावयाच्या? आहेच गाडी तर मारूया चक्कर, अशी भावना बाळगून रस्त्यावर अडचणी निर्माण करणारे रसिक संख्येने वाढत चालले आहेत.

(३) स्वमत/अभिव्यक्ती (४)

वाहन चालवत असताना कोणती काळजी घ्यावी, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**किंवा**

रस्त्यावरील वाहतूककोंडीत सापडल्यावर तुमची भूमिका काय असेल ते लिहा.

**(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

(१) कृती करा. (२)

**लेखकाच्या मते दातांशी निगडित म्हणी व शब्दप्रयोग यांची वैशिष्ट्ये** → ☐ → ☐

Sample Content

(२) खालील चौकटी पूर्ण करा. (२)

(य) **लेखकाला उपद्रव देणारे** → ☐

(र) **लेखकाच्या मते कवीने दाताला दिलेली उपमा** → ☐

दुसरा कुठलाही अवयव उगवताना माणसाला त्रास होत नाही. पण दात हे त्रास दिल्याशिवाय उगवत नाहीत. ते येताना ताप आणि गेल्यावर पश्चाताप!

मला स्वत:ला तर दातांबद्दल मुळीच प्रेम वाटत नाही. कारण लहानपणी मला दात येत असताना त्यांनी घरातल्या माणसांना रडवले होते म्हणे! अर्थात हे सर्वस्वी खरे असेलच असे नाही. त्यांच्याबरोबर मीही रडलो असलो पाहिजे. दात आल्यानंतरही मी दिसेल त्याला चावत असे अशीही एक दंतकथा ऐकून अजूनही कित्येक नातेवाईक माझ्यापासून दूर पळतात. आता मी दिसेल त्याला मुळीच चावत नाही. कारण चावण्याची हौस अनेकदा स्वत:चीच मनगटे चावून चावून भागली आहे! पण माझ्या दातांनी मला एवढा उपद्रव दिला आहे, की त्या मानाने दुसऱ्यांना झालेला उपद्रव काहीच नाही आणि म्हणूनच दातांबद्दल मला दातांत धरता येईल एवढासुद्धा आदर राहिलेला नाही. माझ्याप्रमाणे मराठी भाषेलाही दातांबद्दल आदर नाही असेही मला नंतर आढळून आले. कारण मराठी भाषेत अशी म्हण किंवा शब्दप्रयोग नाही ज्यात दातांबद्दल मंगल भावना व्यक्त झाली आहे. ज्या म्हणी व शब्दप्रयोग दातांशी निगडित आहेत, त्या दारिद्र्य, भिकारपणा, असभ्यपणा यांचे प्रत्यंतर घडवणाऱ्या आहेत. नाही म्हणायला प्रेमविव्हल कवींनी प्रेयसीच्या दातांना कुंदकळ्यांपर्यंत नेऊन पोचवले असेल तेवढाच अपवाद!

(३) स्वमत/अभिव्यक्ती (४)

'दात येताना ताप आणि गेल्यावर पश्चाताप' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

**किंवा**

दातदुखीवर होणाऱ्या घरगुती उपचारांविषयीचा तुमचा अनुभव लिहा.

**(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (४)**

(१) खालील कृती सोडवा. (२)

**लहान मुलांची निरागसता यांतून दिसून येते** → ☐ ☐ ☐ ☐

लहान मूल मग ते कोणाचंही असो, कसंही असो, गोरंगोमटं, सावळं, जाडं, बारीक तरीही ते तेवढंच गोड दिसतं. आजूबाजूने जाणाऱ्या अनोळखी लोकांनाही ते एका हास्यानं आपलंसं करतं. लहान बाळाची नाळ अगदी अनोळखी माणसांसोबतही पटकन जुळते. या लहानग्यांचा लळाही चटकन लागतो. याला कारणीभूत असते ती त्यांच्या अंगी असलेली निरागसता. ही निरागसता त्यांच्या हास्यातून, त्यांच्या हावभावांतून, त्यांच्या हालचालींतून अगदी त्यांच्या रडण्यातूनही दिसून येते. कारण ती त्यांच्या अंतरंगात असते. ही निरागसता त्यांच्या शुद्ध मनाची असते. त्यावर राग-रुसव्याचे, द्वेषाचे, अहंकाराचे, कुबुद्धीचे सावट नसते. ती पवित्र असते आणि म्हणूनच ती प्रत्येकाच्या मनाला भावते. या निरागसतेमुळेच ही बालके मुक्त आनंदाचा अनुभव घेतात. त्यांची प्रत्येक कृती त्यांच्या अंतरंगातून उमलते. त्यामुळेच, त्यांच्यात निखळता दिसते. हीच निरागसता आपणही आपल्या मनी बाळगली, तर आपले व्यवहारही तितकेच आनंदी होतील.

(२) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (२)

(य) बालकांची निरागसता प्रत्येकाच्या मनाला का भावते?

(र) आपले व्यवहार आनंदी केव्हा होतील?

sample content

## विभाग २ – पद्य [१६]

**कृती २. (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (८)**

(१) कृती करा. (२)

**आरशातील स्त्रीने आरशाबाहेरच्या स्त्रीला अधिकारवाणीने केलेला उपदेश** → ☐ → ☐

(२) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा. (२)

(य) प्रेयस चांदणे (र) प्राण हरवलेली पुतळी

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य...!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं...! तू कशी होतीस ते!

पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसे सर्वच बहर लावणारी तू नवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू... तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी!

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पिळवटलेले, खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे,
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय
नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा'
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वत:च हिंदकळतेय
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत
अधिकारवाणीने म्हणाली-

'रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले'

(३) अभिव्यक्ती (४)

कुटुंबातील स्त्रियांच्या भूमिकेबद्दल तुमचे विचार लिहा.

Sample Content

**(आ) खालील ओळींचा अर्थ लिहा.** (४)

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

**(इ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** (४)

**काव्यसौंदर्य**

'उघड गगन, कर घडिभर आसर
आणि खुलें कर वासरमणि-घर
वाहू दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा' या ओळींतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

**किंवा**

**रसग्रहण**

खालील ओळींचे रसग्रहण करा.

मनुष्य इंगळी अति दारुण।
मज नांगा मारिला तिनें।
सर्वांगी वेदना जाण।
त्या इंगळीची।।

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा

[१०]

**कृती ३. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (४)

(१) कृती करा. (२)

(य) [ ] ← **कथेच्या लोकप्रियतेची कारणे लिहा.** → [ ]

(र) [ ] ← **कथा सादरीकरणात या बाबींचे भान ठेवावे** → [ ]

कथेची निवड करणे फार महत्त्वाचे व तितकेच जबाबदारीचे काम असते. कथा सादरीकरणाचा कालावधी व श्रोत्यांचा अवधान काळ यांचे भान कथा सादरीकरणात ठेवावे लागते. कथा ही संवादातून खुलत असल्याने शब्दफेक, प्रभावी उच्चारण, स्पष्टता आणि शब्दांचा गर्भितार्थ श्रोत्यांपर्यंत थेट पोहोचवणे हे एकाचवेळी कौशल्यपूर्ण; पण आव्हानात्मक काम असते.

कथेच्या सादरीकरणाला तंत्रज्ञानाची जोड देऊन सामाजिक संपर्काच्या माध्यमांतून आज कथा वाचकांसमोर येते.

**समारोप**

मौखिक परंपरेपासून सुरू झालेला कथेचा प्रवाह आजही सक्षमपणे खळाळता राहिला आहे. आजही मनोरंजन आणि नित्यनूतन अनुभव देण्याची कथेची क्षमता टिकून आहे. कालानुरूप कथेचे विषय, आशय आणि अभिव्यक्ती बदलत गेली; परंतु ती समाजाशी व संस्कृतीशी बांधील राहिल्याने लोकप्रिय राहिली. वाचकांना कथावाचनाचा आनंद साप्ताहिके, मासिके व दिवाळी अंकांपासून ते सामाजिक संपर्कमाध्यमे या सर्व माध्यमांतून मिळतो.

भाषासौंदर्य, आशयसौंदर्य, अभिव्यक्ती विशेष, सादरीकरण, मनोरंजन आणि बोध या विशेषांमुळे कथा आजही लोकप्रिय आहे.

Sample Content

(२) कथेच्या सादरीकरणासाठी आवश्यक भाषिक कौशल्य लिहा. (२)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

(१) अनुला समाज कसा समजून घ्यायचा आहे, ते थोडक्यात स्पष्ट करा.

(२) संपतीच्या मृत्यूचा गुरुजींच्या मनावर सखोल परिणाम झाला होता हे तुमच्या शब्दांत मांडा.

(३) टॅक्सी ड्रायव्हरचे स्वभावविशेष स्पष्ट करा.

(४) 'गढी'या कथेतील वैदर्भीय बोलीचे तुम्हांला जाणवलेले वेगळेपण लिहा.

## विभाग ४ – उपयोजित मराठी **[१४]**

**कृती ४.(अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(४)**

(१) मुलाखतीच्या मध्यावर घ्यायची काळजी स्पष्ट करा.

(२) माहितीपत्रक म्हणजे काय ते सोदाहरण सांगा.

(३) अहवालाची आवश्यकता लिहा.

(४) व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेखाविषयी सविस्तर माहिती लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

(१) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे अहवालाचे स्वरूप स्पष्ट करा.
अहवाल लेखन परिभाषा – कार्यक्रमाविषयी सामान्य माहिती – लेखी नोंदी – भविष्यकालीन नियोजनाकरिता उपयुक्त – अधिकृतता.

(२) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'वृत्तलेख लिहिताना विचारात घ्यावयाच्या बाबी' स्पष्ट करा.
वृत्तलेखाचा हेतू – विचारात घ्यावयाच्या बाबी – वाचकांची अभिरुची – तात्कालिकता – वेगळेपण – लक्षवेधकता – वृत्तलेखाची शैली.

(३) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'माहितीपत्रक म्हणजे अप्रत्यक्षपणे जाहिरातच' याविषयी लिहा.
पुरातन कला – जाहिरातकलेचा जन्म – जाहिरात क्षेत्राचे उद्दिष्ट – अर्थ – माहितीपत्रक – खिडकी – पहिली पायरी – वैशिष्ट्ये.

(४) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'उमेदवार आतून जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते' हे सोदाहरण स्पष्ट करा.
अंतर्बाह्य व्यापून टाकणाऱ्या मुलाखती – उत्तुंग व्यक्तिमत्त्वांबाबत कुतूहल – पदर उलगडणे – यशाचे गमक – जीवनसंघर्षयात्रा जाणणे – आतील माणूस जाणणे – प्रश्नांद्वारे पैलूंचा उलगडा – उदाहरण.

## विभाग ५ – व्याकरण व लेखन **[२०]**

**व्याकरण घटक व वाक्प्रचार.**

**कृती ५. (अ) सूचनेनुसार कृती करा.** **(१०)**

(१) मी तुम्हांला ओळखत नाही. (होकारार्थी करा.) (१)

(२) खालील वाक्याचे योग्य विधानार्थी वाक्यात रूपांतर करा. (१)
निरोगी राहावे असे कोणाला वाटत नाही?
(अ) निरोगी राहावे असे कोणालाही वाटत नाही.
(ब) निरोगी राहावे असे सर्वांनाच वाटत नाही.
(क) निरोगी राहावे असे सर्वांनाच वाटते.
(ड) रोगट राहावे असे सर्वांनाच वाटत नाही.

Sample Content

(३) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
'कमलनयन' या शब्दाचा समास ओळखा.
(अ) अव्ययीभाव समास (ब) द्वंद्व समास
(क) कर्मधारय समास (ड) द्विगू समास

(र) खालील सामासिक शब्दाचा विग्रह करा. (१)
काळागोरा

(४) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
कप्तानाने सैनिकांना सूचना दिली.
या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.
(अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग
(क) भावे प्रयोग (ड) यांपैकी नाही.

(र) योग्य पर्याय निवडा. (१)
कर्तरी प्रयोग असलेले वाक्य ओळखा.
(अ) तो रडला. (ब) चित्राने मेहंदी काढली.
(क) पोलिसांनी चोराला पकडले. (ड) अमितला आता चालवते.

(५) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
अलंकार ओळखून लिहा.
मुंगी उडाली आकाशी
तिने गिळिले सूर्यासी!
(अ) अर्थान्तरन्यास (ब) अनन्वय अलंकार
(क) अपन्हुती अलंकार (ड) अतिशयोक्ती अलंकार

(र) उपमेय ओळखा. (१)
न हे चरण, कमलचि ते आरक्त!

(६) (य) 'हात देणे' या वाक्प्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा. (१)
(अ) साद घालणे (ब) मदत करणे
(क) ओळख देणे (ड) फसवणे

(र) 'हात देणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (१)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा. (१०)**
(१) शाळेचे आत्मवृत्त
(२) वाचन : एक उत्तम छंद
(३) मी पोलिस झालो तर…
(४) मी पाहिलेला अपघात
(५) माझे आवडते व्यक्तिमत्त्व

Sample Content

Page no. **13** to **74** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# नमुना उत्तरपत्रिका

Sample Content

# नमुना उत्तरपत्रिका : १

**उत्तरपत्रिकेसाठी सूचनाः -**

(१) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दद्यावे.

(४) नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर सुरू करावे.

**विभाग १ – गदय** [२०]

कृती १. (अ)

(१) (य) कामापुरते आणि कामासाठी वाहन वापरले जाते (१ गुण)

(र) वाहनांचा वेग आटोक्यात राहील एवढाच ठेवला जातो (१ गुण)

(२) (य) इतरांशी मानसिक स्पर्धा करण्यासाठी (१ गुण)

(र) आपल्या ऐश्वर्याचे प्रदर्शन घडवण्यासाठी (१ गुण)

(३) वाहन चालवणे ही एक कला आहे. ती योग्य प्रकारे आत्मसात करणे आवश्यक ठरते. वाहन चालवताना आपल्याकडे कायदेशीर परवाना असेल याची खात्री करावी. वाहतुकीचे सर्व नियम जाणून घेऊन त्या नियमांचे तंतोतंत व काटेकोर पालन करावे. वाहनाचा वेग नेहमीच प्रमाणात व नियंत्रणात ठेवावा. अतिवेगाच्या आहारी जाण्याचा हव्यास कधीही करू नये. स्पर्धा म्हणून, सहज गंमत म्हणून, दिखावा म्हणून, साहसी कृत्य म्हणून कोणत्याही कारणास्तव वाहनाचा वेग वाढवू नये. आपले वाहन अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गतीने कधीच चालवू नये. कारण नसताना हॉर्न वाजवू नये. आवश्यकता असेल तरच, प्रमाणातच हॉर्नचा वापर करावा. सिग्नलवर गाडी विनाकारण चालू ठेवून इंधन वाया घालवू नये. दुचाकीवरून प्रवास करताना त्यावर स्वार असलेल्यांनी हेल्मेटचा वापर नेहमी करावा. चारचाकी गाडीमध्ये प्रवास करताना संरक्षक पट्ट्याचा (सेफ्टी बेल्टचा) वापर करावा. वाहने चालवताना मोबाइल फोनवर बोलणे टाळावे. वाहने चालवताना गप्पा मारणे टाळावे. सिग्नल व्यवस्थेचे पालन करावे. धोकादायक वळणांवर गाडीचा वेग कमी करावा. अशावेळी ओव्हरटेक करणे टाळावे. घाटाच्या रस्त्यात वाहनांचा वेग कमी असावा. गतिरोधकांकडे, रस्त्यावरील विविध सूचनांकडे लक्ष देऊन त्या पाळाव्यात. झेब्रा क्रॉसिंगवर गाडी थांबवावी. अशा लहान लहान नियमांचे पालन केल्यास मोठ्या अपघातांतून वाचणे सहज शक्य होते. (४ गुण)

Sample Content

**किंवा**

भविष्यात जर रस्त्यावरील वाहतूककोंडीत मी सापडलो, तर सर्वप्रथम कोणत्या कारणामुळे वाहतूककोंडी झाली आहे हे जाणून घेण्याचा मी प्रयत्न करेन. म्हणजेच, सिग्नल यंत्रणेत बिघाड होणे, अपघात होणे, सिग्नल तोडून वाहने चुकीच्या मार्गाने घुसवणे यांपैकी नक्की कोणते कारण आहे हे मी शोधेन. जर सिग्नल यंत्रणेत बिघाड झालेला असेल, तर मी त्वरित वाहतूक नियंत्रण कक्षाला फोन करून त्याची माहिती देईन. अपघात झालेला असल्यास अपघातग्रस्तांना मदत करेन. त्यासाठी पोलिसांना, तसेच रुग्णवाहिकेस फोन करेन. लवकरात लवकर रस्ता मोकळा व्हावा यासाठी प्रयत्न करेन. लोक सिग्नल तोडून जात असल्यास त्यांना समजावून सांगत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करेन. महत्त्वाचे म्हणजे मी विनाकारण हॉर्न वाजवणार नाही. आपली रांग मोडून मध्ये घुसणार नाही आणि इतरांनाही हे करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करेन. गाडीचे इंजीन बंद करून इंधन वाचवेन. गुगलच्या साहाय्याने कोंडी किती झाली आहे, याची अद्ययावत माहिती मी देत राहिन; जेणेकरून इतर प्रवासी पर्यायी मार्गांचा अवलंब करून कोंडीपासून वाचू शकतील. पर्यायी रस्ता जर उपलब्ध असेल, तर त्याचा वापर करेन. (४ गुण)

**(आ)**

(१) (य) यांतून दातांबद्दल मंगल भावना व्यक्त होत नाहीत. (१ गुण)

(र) दारिद्र्याचे, भिकारपणाचे व असभ्यपणाचे प्रत्यंतर यांतून घडते. (१ गुण)

(२) (य) दात (१ गुण)

(र) कुंदकळ्या (१ गुण)

(३) 'दात येताना ताप आणि गेल्यावर पश्चाताप' या विनोदी वाक्यातून लेखकांनी प्रत्येक माणसाच्या आयुष्यात येणारे दोन टप्पे अगदी सहजतेने मांडलेले दिसतात. लहानपणी दात येत असताना लहान मुलांना त्रास होतो. हिरड्यांना सुटणारा कंट, हिरड्यांचे दुखणे, ताप येणे, पोट खराब होणे इत्यादी तक्रारींमुळे मुले सतत चिडचिड करत असतात. पुढे म्हातारपणात जेव्हा दात गळून पडतात त्यावेळी खाण्यापिण्याच्या तक्रारी होतात. अनेक पदार्थ खाण्यापासून लोक वंचित राहतात. दातांच्या जागी कवळ्या बसतात. दातांचे दुखणे याकाळात असह्य होते आणि दात पडल्याने लोकांत हसेही होते. मानवाच्या जन्मानंतर उशिरा येणारे आणि मृत्युपूर्वी लवकर निघून जाणारे दात येताना, जाताना आणि गेल्यावरही वेदना देऊन जातात. अशाप्रकारे, लेखकाने पाठात वापरलेले हे विधान जीवनाचे सत्य सांगणारे आहे एवढे मात्र निश्चित. (४ गुण)

Sample Content

**किंवा**

मागील वर्षी ऐन दिवाळीच्या सुट्टीतच फराळ खाल्ल्यावर मला दातदुखीचा त्रास उद्भवला. त्या वेदना आठवून आजही माझ्या अंगावर काटा येतो. त्यात माझ्यासोबत माझे संपूर्ण कुटुंबही माझ्या ओरडण्यानं, चिडचिडीनं हैराण झालं होतं. मग त्यांनी एकएक घरगुती उपाय माझ्यावर सुरु केले. आजही आठवलं तरी त्या 'वेदना बऱ्या; पण उपचार नकोत' असेच वाटते. सुरुवातीला आईने दाताखाली लवंग पकडायला दिली. तिने जिभेला चटकाच बसला. मग आजीने कापूर आणून दातात ठेवला. त्याच्या उग्र वासाने पोटातलं सगळं बाहेर आलं. आता तर उपचारांची भीती वाटू लागली होती. शेजारच्या काकूंनी तर कापसात बाम भरून त्याचा बोळा दाताखाली ठेवायला दिला. थोड्याच वेळात तोंडाची आग-आग झाली; पण फरक मात्र काडीचाही पडला नाही. शेवटी आजोबांनी पेरूचा पाला आणला. तो दातात ठेवला आणि तोंडात कारल्याचा रस ओतल्यासारखे वाटले. मग बाबांनी दंतवैद्याकडे नेले आणि चमत्कार म्हणजे दहा मिनिटांतच मला बरं वाटू लागलं. माझा जीव भांड्यात पडला; पण या सगळ्यामुळे आता मला त्या दातदुखीपेक्षा त्यावरील उपचारांचीच जास्त भीती वाटते आणि फराळाचा तर मी धसकाच घेतला आहे. त्यामुळे, मित्रांनो असा काही त्रास झाल्यास तातडीने दंतवैद्याला गाठा असा मी सल्ला देईन. (४ गुण)

**(इ)**

(१) (य) हास्यातून (१/२ गुण)

(र) हावभावातून (१/२ गुण)

(ल) हालचालींतून (१/२ गुण)

(व) रडण्यातून (१/२ गुण)

(२) (य) बालकांची निरागसता पवित्र असल्याने ती प्रत्येकाच्या मनाला भावते. (१ गुण)

(र) लहान बालकांमध्ये असणारी निरागसता जेव्हा आपण आपल्या मनी बाळगू तेव्हाच आपले व्यवहार आनंदी होतील. (१ गुण)

Sample Content

## विभाग २ – पदय [१६]

कृती २. (अ)

(१) (य) डोळ्यांतील दुःखाचे अश्रू पुसून टाक (१ गुण)

(र) स्वतःच्या जीवनात प्रसन्नता, आनंद आणण्यासाठी प्रयत्न कर (१ गुण)

(२) (य) पूर्वीच्या काळी त्या आरशाबाहेरील स्त्रीला हवेहवेसे वाटणारे, तिचे अत्यंत आवडते चांदणे दर्शवण्यासाठी 'प्रेयस चांदणे' असा शब्दसमूह कवयित्री वापरते. (१ गुण)

(र) संसाराच्या रहाटगाड्यात स्वतःचे अस्तित्व, स्वत्व, विसरून गेलेली आणि इतरांच्या म्हणण्यानुसार वागणारी, बोलणारी कठपुतळी ही प्रतिमा लेखिका आरशाबाहेरील स्त्रीसाठी वापरते. (१ गुण)

(३) कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणे स्त्री ही देखील त्या कुटुंबाचा महत्त्वाचा हिस्सा असते; किंबहुना कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळत आर्थिक बाबींमध्येही कुटुंबाला समर्थपणे उभे करण्याचे कार्य स्त्री करताना दिसते. आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या न टाळता ती खमकेपणाने त्या साऱ्या पार पाडते. यात कुठेही हलगर्जीपणा ती करत नाही. कुटुंबाच्या महत्त्वाच्या निर्णयांमध्येही ती सहभागी असते. साऱ्या कुटुंबातील सदस्यांना जोडून ठेवण्याचे कार्य ती पार पाडते. कुटुंबाच्या आर्थिक गरजेलाही ती तेवढ्याच खमकेपणाने सामोरी जाते. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावत आपल्या शिक्षणाच्या बळावर ती घराला आर्थिक स्थैर्यही प्राप्त करून देते. ती मुळातच सहनशील असल्याने ही तारेवरची दुहेरी कसरत करताना ती चिडत नाही. थकली तरीही बोलत नाही. आपले कुटुंब ही आपली जबाबदारी समजून सतत स्वतःला खेचत राहते. स्वतःचे अस्तित्व विसरून ती पूर्णपणे कुटुंबाचे हित पाहत असते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याची जबाबदारी उचलून ती घराचा आधारस्तंभ बनते. अशारीतीने, स्त्रीची कुटुंबातील भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

(४ गुण)

(आ) 'रोज मातीत राबराब राबल्यानंतरच शेतात हिरवाई फुलते. आपला जीवच मातीत रुजवावा इतक्या मनापासून मी शेतात बी-बियाणे लावते. माझ्या संसाराला थोडीफार मदत व्हावी, म्हणून मी रोज शेतात मरमर करते. ऊन-पाऊस, थंडी-वारा किंवा सोसाव्या लागणाऱ्या कष्टांची मी पर्वा करत नाही. माझे सर्वस्व, जीव ओतून जेव्हा मी काम करते, तेव्हा कुठे शेत हिरवेगार होते. मरमर कष्ट उपसल्यानंतर शेतात हिरव्या समृद्धीच्या रूपाने जणू काही मीच मागे शिल्लक राहते. खोल विहिरीतील पाणीसुद्धा मी आनंदाने उपसून काढते. अशाप्रकारे, मी मातीत आनंदाने नांदते.' (४ गुण)

Sample Content

(इ) 'रे थांब जरा आषाढघना' या कवी बा.भ.बोरकर यांच्या कवितेत आषाढ महिन्यातील निसर्गसौंदर्याचे वर्णन केले आहे. हे अनुपम निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी आषाढघनाने क्षणभर थांबावे आणि स्वतःच निसर्गात घडवलेली जादुई किमया पाहण्याची संधी आपल्याला द्यावी अशी इच्छा कवीने येथे व्यक्त केली आहे. कारण आषाढातील पावसाने शेते, माती, बांबूंची वने, फुलझाडे अशा निसर्गातील प्रत्येक घटकाचे सौंदर्य वाढवले आहे. हे निसर्गसौंदर्य कवीला मनसोक्तपणे अनुभवायचे आहे. त्यामुळे, 'हे मेघा, तू हे आकाशात दाटलेले मळभ जरा दूर कर, क्षणभरासाठी आकाश निरभ्र, स्वच्छ होऊ दे. तुझ्या या जादुई चमत्कारावर कोवळी, नवी, हळदीच्या रंगाची सूर्यकिरणे पडू दे.' अशी विनंती कवी येथे आषाढघनाला करतो. (४ गुण)

**किंवा**

'विंचू चावला.....' या संतकवी एकनाथ यांच्या भारुडात सर्वसामान्यांना राग, अनिर्बंध इच्छांचा मोह अशा विकारांपासून दूर राहण्याचा संदेश दिला आहे. त्यासाठी सत्त्वगुणांचा आश्रय घ्यावा व सद्‌गुरुकृपेचा लाभ घ्यावा असा उपदेश यात केला आहे.

येथे विंचू हे रूपक वापरले असून ते काम आणि क्रोधाचे प्रतीक आहे. माणसातील विकारांना 'इंगळीचे' रूपक वापरून तिच्या दंशाची भयंकरता दाखवण्यासाठी कवी 'दारुण' हा समर्पक शब्द वापरतो. तिच्या नांगी मारण्यामुळे सर्वांगामध्ये वेदनेची लाट उसळली आहे, असा आशय वरील ओळींत कवी व्यक्त करतो.

प्रस्तुत कवितेची भाषा, सर्वसामान्यांना चटकन समजेल असे विंचवाचे रूपक घेऊन मोठा आध्यात्मिक विचार समजावते. विंचू चावल्यानंतरच्या असह्य वेदना, कळा नेमकेपणाने आपल्यासमोर मांडते. ही रचना विलक्षण नाट्यपूर्ण व मनाची चटकन पकड घेणारी आहे.

येथे भारुड हा वाङ्मयप्रकार वापरला गेला आहे. मानवतावादी मूल्यांचे संवर्धन व्हावे म्हणून रचलेल्या संत एकनाथांच्या या भारुडाने लोकशिक्षणाचे कार्य केले आहे. समजायला अत्यंत सोपी व आकर्षक अशी ही रचना काळाच्या ओघातही आपले वेगळेपण टिकवून आहे. तसेच, आजही तितकीच प्रबोधनपर, प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे.

प्रत्येक चरणात यमक अलंकार साधला जाऊन कवितेला नादमयता प्राप्त झाली आहे. हे संतकाव्य असून त्यात एकनाथकालीन मराठी भाषेचे दर्शन घडते. हे भारुड वाचताना शांती (शम) हा स्थायिभाव निर्माण होऊन शांत रसाचा अनुभव मिळतो. (४ गुण)

Sample Content

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा [१०]

कृती ३. (अ)

(१) (य) i. भाषासौंदर्य ii. आशयसौंदर्य
iii. अभिव्यक्ती विशेष iv. सादरीकरण
v. मनोरंजन vi. बोध
vii. कथेचे समाज व संस्कृतीशी बांधील असणे

**[टीपः** विद्यार्थ्यांनी वरीलपैकी कोणतीही दोन उत्तरे लिहावीत.**]** (प्रत्येकी १/२ गुण)

(र) i. कथा सादरीकरणाचा कालावधी i. श्रोत्यांचा अवधान काळ (प्रत्येकी १/२ गुण)

(२) कथेच्या सादरीकरणासाठी आवश्यक भाषिक कौशल्ये पुढीलप्रमाणेः
(य) संवादातील शब्दफेक
(र) प्रभावी उच्चारण
(ल) स्पष्टता
(व) शब्दांचा गर्भितार्थ श्रोत्यांपर्यंत पोहोचवणे (प्रत्येकी १/२ गुण)

**(आ)**

(१) अनुला स्वतःच्या स्वतंत्र नजरेतून समाज पाहायचा, अनुभवायचा आणि समजून घ्यायचा आहे. जगाकडे पाहण्यासाठी तिला स्वतःचा असा नवा चष्मा हवा आहे. प्रत्येक वस्तूचे, घटनेचे, व्यक्तीचे मूल्यमापन करण्यासाठी लागणारी स्वतंत्र नजर तिला तयार करायची आहे. हे स्वतःचे अनुभव तिला स्वतःच जमा करायचे आहेत. त्यासाठी तिला समाजात मिसळायचे आहे. व्यक्तींच्या सान्निध्यात राहायचे आहे. 'समाज ही व्यापक अर्थाने व्यक्तीच असते आणि व्यक्ती एक घटकरूपाने समाजच आहे,' या विधानाची सत्यता शोधून काढण्यासाठी तिला नर्सिंग शिकून नर्सची नोकरी करायची आहे. या सर्व गोष्टींमधून अनुला समाज स्वतंत्र दृष्टिकोनातून व स्वानुभवातून समजून घ्यायचा आहे, हे स्पष्ट होते. (३ गुण)

(२) बापू गुरुजींनी त्यांना मिळालेल्या सत्काराच्या रकमेतून आजूबाजूच्या गावातील मुलांची राहण्याची सोय व्हावी म्हणून बोर्डिंग सुरू केले. त्या बोर्डिंगमध्ये संपत्या नावाचा मुलगा होता. गुरुजी सर्वच मुलांवर जिवापाड प्रेम करत; पण संपत्याला वडील नसल्याने त्याच्यावर त्यांची माया अधिक होती. ते त्याच्यावर पोटच्या मुलासारखं प्रेम करत. एके दिवशी शिक्षण समितीच्या बैठकीसाठी गुरुजी अकोल्याला जायला

Sample Content

निघाले तेव्हा संपत्या त्यांना 'जाऊ नका' म्हणून मागे लागला होता; परंतु कामही महत्त्वाचे असल्याने गुरुजी तेथे गेले. त्यादरम्यान संपत्या पटकीच्या आजाराचे निमित्त होऊन वारला. गुरुजी या प्रकाराने ओक्साबोक्शी रडले होते. त्यावेळी गावात डॉक्टरच नसल्याने त्याच्यावर उपचार होऊ शकले नव्हते. औषधपाण्याशिवाय संपत्यासारख्या गुणी मुलाला आपला जीव गमवावा लागल्यामुळे लवकरात लवकर गावात दवाखाना झालाच पाहिजे असा त्यांनी मनाशी पक्का निश्चय केला. जेव्हा केव्हा त्यांना संपत्याची आठवण येई, तेव्हा तेव्हा त्यांचे डोळे पाणावत, त्यांच्या हृदयात कालवाकालव होत असे. यावरून त्यांचे संपत्यावरचे प्रेम दिसून येते. त्याच्या मृत्यूचा त्यांच्या मनावर किती खोलवर परिणाम झाला होता हे यावरून कळते. (३ गुण)

(३) कथेतील टॅक्सी ड्रायव्हर खूप सालस, मेहनती व प्रामाणिक असे व्यक्तिमत्त्व आहे. तो नवशिका, शिक्षित आणि नम्र आहे. त्याची काहीही चूक नसताना चौकात घडलेल्या अपघातामुळे त्याला पोलीस स्टेशनमध्ये जावे लागते. भिडेंनी माणुसकी दाखवून त्याच्या बाजूने जबानी दिल्यामुळे तो बचावतो. या उपकारांमुळे तो भिडेंचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. त्यावरून त्याच्यातील कृतज्ञतेचे दर्शन घडते. भिडेंनी दिलेल्या भाड्याच्या पैशांतील एक रुपयाची नोट बदलून देण्याची भिडेंची विचित्र मागणी तो फार काही न बोलता पूर्ण करतो. बिनधास्तपणे आपल्या खिशातील सर्वच्या सर्व नोटा न मोजता भिड्यांच्या हातात देतो. यावरून त्याची कार्यतत्परता व इतरांना मदत करण्याची वृत्ती दिसून येते. अनुला हवी ती नोट मिळाली नाही हे पाहून तो स्वतः त्या नोटेचा शोध घेण्यासाठी सर्वांना घेऊन पोलीस स्टेशनसमोरील हॉटेलात जातो, ती नोट शोधण्याच्या कामात तो स्वतः पुढाकार घेतो. त्याच्या या प्रयत्नांमुळेच अनुला ती नोट सापडते. शिवाय, अनुची त्या नोटेमागची हृदयद्रावक कहाणी ऐकून तोही गलबलून जातो. त्याच्यातील संवेदनशीलता जागृत होते. माणसाने कोणत्याच गोष्टीत अडकून पडू नये, असा सल्ला तो तिला आपुलकीपोटी देतो. त्याला कटू वास्तवाचे भान आहे. न शोधता येण्यासारख्या वस्तूचा शोध घेणे खूप कठीण असते, असे जगण्याचे तत्त्वज्ञान अगदी सहजपणे तो तिला सांगून जातो. आपली मुलगी देवाघरी गेल्याचे भयंकर दुःख बाजूला ठेवून तो जगण्याचा प्रयत्न करत आहे, यावरून त्याच्या जीवनाकडे पाहण्याच्या वास्तववादी व सकारात्मक दृष्टिकोनाचेही दर्शन घडते. (३ गुण)

(४) मराठीच्या बोलींपैकी एक असलेल्या वैदर्भीय बोलीचे वेगळेपण म्हणजे तिच्यातील गोडवा, माधुर्य. ती मराठीशी मिळतीजुळती वाटत असली तरी तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. गढी या कथेत वैदर्भीय बोलीचा प्रभावी वापर करून लेखिकेने कथेचे सौंदर्य वाढवले आहे. गढी, वान नदी, वटवृक्ष अशा प्रतीकांचा वापर



Sample Content

करून ती वैदर्भी बोलीद्वारे ग्रामीण वातावरण आपल्यासमोर हुबेहूब उभे करते. स्वातंत्र्योत्तर काळात गावगाड्यासमोर उभे असलेले प्रश्न, गावातील बरीवाईट स्थित्यंतरे असा किचकट व गंभीर विषय ती या बोलीच्या माध्यमातून सहजसोपा करते. त्यामधील संवेदनशीलता व ग्रामजीवनातील साधेपणा व गोडवा या बोलीमुळेच आपल्यापर्यंत पोहोचतो.

'मले पा आन् फुलं वहा', 'त्याइचा जीव अंदरल्या अंदर लोये', 'चाल व्हयरे पोरा आन् वयरे ढोरा', 'मानसानं पयले पानी पावावं आन् मग पोवावं, पाखरानं पयलं पख पारखावं आन् मंग उळाव.', 'हळ्याच्या सरपानं मानसं मरत नसतात.', 'गायीचे शिंगं गायीलें भारी नसतात.' अशा म्हणींचा खजिना या बोलीत आहे, जो बोलीचे सौंदर्य खुलवतो व तिला समृद्ध करतो.

तसेच, वैदर्भीय बोलीत 'ळ' या अक्षराच्या ऐवजी 'य' हे अक्षर, तर 'ड' या अक्षराच्या जागी 'ळ' हे अक्षर वापरले जाते. 'ला' ऐवजी 'ले' म्हणजेच मले, तुले, गावाले असे शब्द वापरले जातात. 'हो' या अक्षराच्या जागी 'व्ह', 'ण' च्या जागी 'न' वापरतात. 'त्याला', 'ह्याला', ऐवजी 'त्याइले', 'ह्याइले' असे शब्द वापरले जातात. अशा प्रकारचे भाषेतील गोडवा टिपणारे वैदर्भीय भाषेचे वेगळेपण या कथेतून जाणवते.

(३ गुण)

Sample Content

## विभाग ४ – उपयोजित मराठी [१४]

कृती ४. (अ)

(१) दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये नियोजनपूर्वक झालेला सहेतूक वैचारिक, भावनिक संवाद म्हणजे मुलाखत होय. या मुलाखतीचे स्वरूप लक्षात घेता तिचे तीन टप्प्यांमध्ये विभाजन करता येते.

१. मुलाखतीची सुरुवात २. मुलाखतीचा मध्य ३. मुलाखतीचा समारोप

या टप्प्यांमधून मुलाखत पूर्णत्वास येते. त्यातील मुलाखतीचा मध्य हा मूळ मुलाखतीचा गाभा मानला जातो.

**मुलाखतीच्या मध्यावर घ्यायची काळजी पुढीलप्रमाणे:**

i. विचारायच्या प्रश्नांची यादी क्रमानुसार समोर असेलच; पण त्याच क्रमाने विचारत गेल्यास मुलाखत रुक्ष, पठडीछाप होऊ शकते. यासाठी मिळालेल्या उत्तराचा धागा पकडून पुढे जाता येईल असे प्रश्न तयार करता यायला हवेत. प्रश्नांची यादी मुलाखतकारासाठी असते. प्रेक्षकांसाठी नाही. हे लक्षात घ्यावे. आयत्या वेळेची ही कसरत सरावाने सहज साध्य होते. अशा प्रश्नोत्तरांची रंगीबेरंगी फुले एकामागे एक मुलाखतीच्या धाग्यात गुंफत गेले, की प्रश्नांतून उत्तरे, उत्तरांतून प्रश्न असे बघता बघता मुलाखतदात्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आपसूकच उलगडत जातात. या पायरीवर मूळ विषयाचा संदर्भ सुटून मुलाखतीचा हेतू भरकटू नये याची काळजी घ्यावी.

ii. मुलाखत रंजक असायलाच हवी; मात्र रंजकतेच्या आहारी जाऊन मुलाखतीचे उद्दिष्ट भरकटू देऊ नये.

iii. मुलाखतीच्या मध्यावर मुलाखतदात्याचे व्यक्तिमत्त्व, कार्यकर्तृत्व उलगडत जावे. विषयाचे, व्यक्तिमत्त्वाचे, विचारधारेचे सर्व कंगोरे समोर यावेत.

iv. मुलाखत घेणाऱ्याने, मुलाखत देणाऱ्याला या टप्प्यावर जास्तीत जास्त वेळ द्यावा. त्यांना व्यक्त होऊ द्यावे. उत्तरदात्याचा उत्साह वाढत जावा अशी प्रश्नांची गुंफण करावी.

v. मुलाखतीत सर्वांत जास्त महत्त्वाचे, विषयाशी थेट संबंधित प्रश्न विचारावेत. मुलाखत तिच्या सर्वोच्च बिंदूकडे अग्रेसर होत जावी.

अशारीतीने, या टप्प्यावर मुलाखत दात्याशी दिलखुलास गप्पा मारुन मुलाखतीचे उद्दिष्ट संपन्न करावे. (२ गुण)

(२) जागतिकीकरणाच्या युगात ग्राहक अधिक चौकस व चिकित्सक झालेले बघावयास मिळत आहेत. कोणताही व्यवहार करताना आता लोकांना संबंधित व्यवहाराबद्दलची सखोल माहिती हवी असते. हा तपशील घरबसल्या मिळवून देणाऱ्या लिखित साधनांपैकी एक प्रभावी साधन म्हणजे माहितीपत्रक. थोडक्यात,

Sample Content

माहितीपत्रक म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण माहिती देणारे परिचयात्मक पत्रक होय. हे माहितीपत्रक म्हणजे नवनव्या योजनांकडे, उत्पादनांकडे, संस्थांकडे, लोकांनी डोकावून पाहावे यासाठीची खिडकी आहे. जनमत आकर्षित करण्यासाठीचे ते एक लिखित स्वरूपाचे जाहीर आवाहन असते. नवीन ग्राहक मिळवण्याची, नवीन बाजारपेठ काबीज करण्याची ती पहिली पायरी आहे.

माहितीपत्रक म्हणजे काय हे पुढील उदाहरणातून अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.

**यशस्वी कृषी उद्योजिका बना...**

**नागोठणे, रोहा येथे प्रथमच**

भाजीपाला उत्पादन प्रशिक्षण एकदिवसीय कार्यशाळा.

वार-रविवार, दिनांक २ मार्च २०२२,

वेळ सकाळी १०:०० ते ६:००

गृहिणी, विद्यार्थिनी, नोकरदार महिला यांच्यासाठी सुवर्णसंधी

'आधुनिक शेती'

'खर्च कमी उत्पादन अधिक'

कार्यशाळेत शिकवले जाणारे विषय

- भाजीपाला लागवडीसंदर्भातील माहिती
- भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान
- शेतमाल विक्री मार्गदर्शन
- लागवडीचे प्रात्यक्षिक
- खते, कीटकनाशके यांबाबत मार्गदर्शन

**प्रवेश फी ₹ ५००/-**

**ठिकाण:** साधना विद्यापीठ, नागोठणे, तालुका - रोहा, जिल्हा - रायगड.

**संपर्क:** ×××××××××× / ××××××××××

Sample Content

वरील माहितीपत्रक भाजीपाला उत्पादन प्रशिक्षणाच्या एक दिवसीय कार्यशाळेविषयी ग्राहकांना माहिती पुरवते. कमी खर्चात भाजीपाला निर्मिती उद्योगाची उभारणी कशी करता येईल हा या माहितीपत्रकाचा आकर्षण बिंदू आहे. येथे ग्राहकांची गरज लक्षात घेतलेली दिसते. अशाप्रकारे, माहितीपत्रक ग्राहकाची नस पकडून त्याची गरज ओळखणारे असते. (२ गुण)

(३) एखाद्या कार्यालयात किंवा संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची किंवा समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजेच 'अहवाल लेखन' होय. शाळा-कॉलेज-महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या क्रीडास्पर्धा, स्नेहसंमेलने, तसेच शासकीय, सामाजिक, आर्थिक संस्थांचे होणारे कार्यक्रम यांचे कार्यक्रमानंतर अहवाल लिहिले जातात. यांचा भविष्यकाळात विविध प्रकारे उपयोग केला जाऊ शकतो.

**अहवालाची आवश्यकताः**

i. कार्यक्रमांच्या, समारंभांच्या नोंदी या भविष्यकाळात संस्थेचा विकास, परंपरा यांची माहिती करून घेण्यास उपयोगी पडतात.

ii. भविष्यकालीन नियोजनासाठी अहवाल उपयोगी पडतो.

iii. विविध संस्था, लघुउद्योग, मोठे उद्योगधंदे, तसेच ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंतच्या सर्व घडामोडींना अधिकृतता प्राप्त व्हावी यासाठी अहवालाची गरज असते.

iv. एखाद्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी भूतकाळातील माहितीचा स्रोत म्हणून अहवाल कामी येतो.

v. सार्वजनिक क्षेत्रात एखादा महत्त्वाकांक्षी उद्योग वा उपक्रम सुरू करायचा असेल, तर अगोदर त्या संदर्भात योग्य ती माहिती जमा करून अहवाल तयार करणे गरजेचे असते.

vi. विश्वासार्ह माहिती आणि तटस्थ नोंदींमुळे अहवाल विश्वसनीय होतो. त्यामुळे, गुंतागुंतीच्या समस्यांमध्ये पुरावा म्हणूनही असे अहवाल वापरता येतात. (२ गुण)

(४) बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण माहिती, तिचे सूक्ष्म धागेदोरे व वेगवेगळे तपशील वाचकांना ज्यातून वाचावयास मिळतात तो लेखनप्रकार म्हणजे 'वृत्तलेख'.

**वृत्तलेखाचे प्रकारः**

बातमीवर आधारित वृत्तलेख

व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेख

मुलाखतीवर आधारित वृत्तलेख

ऐतिहासिक स्थळांविषयी वृत्तलेख

नवल, गूढ, विस्मय इत्यादींवर आधारित वृत्तलेख

**व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेखः**

i. यांपैकी व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेखात असामान्य कर्तृत्व असलेल्या व्यक्तीसंबंधित लिहिले जाते, तसेच एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण कार्य असलेल्या सामान्य माणसाबद्दलदेखील लिहिले जाऊ शकते.

ii. एखाद्या क्षेत्रात मिळवलेले देदीप्यमान यश, केलेला संघर्ष व प्रयत्नांची पराकाष्ठा, एखाद्या समस्येवर मात करताना केलेले उपक्रम, कृती, केलेला विक्रम यासंदर्भात औचित्य साधून वृत्तलेख लिहिले जातात.

iii. औचित्य साधून व्यक्तीला मिळालेले पुरस्कार, गौरव, वाढदिवस, अमृत महोत्सव, जयंती, पुण्यतिथी, जन्मशताब्दी अशा प्रसंगी व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेख लिहिले जातात. हे वृत्तलेख त्या

Sample Content

व्यक्तीबद्दल पूर्वी केले गेलेले लेखन, चरित्र, आत्मचरित्र, त्यांच्यासोबत काम केलेल्या व्यक्ती, सहकारी यांच्या मुलाखती घेऊन अधिक चांगल्या प्रकारे फुलवता येतात.

iv. वाचकांच्या पुढे फक्त जीवनपट मांडणे अपेक्षित नसते. फक्त आकडेवारी, सनावळ्या, परिचय यांपुरते ते मर्यादित नसते.

v. यात व्यक्तीची जीवनशैली, वेगळेपण, दृष्टिकोन, खास शैली, सवयी, वैशिष्ट्ये असा व्यक्तिगत, भावनिक स्पर्श असतो. उदा. पोपटराव पवार, बीजमाता राहीबाई पोपेरे, डॉ. श्रीराम लागू इत्यादी.

(२ गुण)

**(आ)**

(१) एखाद्या कार्यालयात किंवा संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची, समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजे 'अहवाल लेखन' होय. अहवाल लेखनात कार्यक्रमाचा हेतू, तारीख, वेळ, सहभागी व्यक्ती, कार्यक्रमाचा विषय प्रतिसाद, समारोप अशा विविध मुद्द्यांचा समावेश केलेला असतो. कार्यक्रम किंवा समारंभ प्रत्यक्षात सुरू झाल्यापासून ते तो कार्यक्रम / समारंभ संपेपर्यंत क्रमाक्रमाने काय काय झाले व कसे झाले याची आवश्यक तेवढ्या तपशिलांसह लेखी नोंद अहवालात केली जाते.

सर्वेक्षण अहवाल, माहिती संकलन अहवाल, कृती अहवाल, प्रगती अहवाल, विशिष्ट विषयासंबंधी नेमलेल्या आयोगाचे अहवाल, तपासणी अहवाल, चौकशी अहवाल, आढावा अहवाल, मासिक अहवाल, वार्षिक अहवाल, शालेय अहवाल, क्षेत्र अहवाल इत्यादी अनेक प्रकारच्या अहवालाच्या स्वरूपातील नोंदी भविष्यकालीन नियोजनासाठी उपयुक्त ठरतात. वेगवेगळ्या घडामोडींना हे अहवाल अधिकृतता प्राप्त करून देण्याकरिता उपयुक्त ठरतात. (५ गुण)

(२) बातमीपलीकडे असलेला तपशील वाचकांना देण्यासाठी वृत्तलेखाचा अवलंब केला जातो. बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण, माहिती, तिचे सूक्ष्म धागेदोरे व वेगवेगळे तपशील हे वाचकांना वृत्तलेखात वाचावयास मिळतात.

**वृत्तलेख लिहिताना पुढील गोष्टी विचारात घ्याव्यातः**

**i. वाचकांची अभिरुचीः** आपले वाचक, त्यांची गरज, अभिरुची लक्षात घेऊन वर्तमानपत्रात लेखन करावे लागते. एखादे वृत्तपत्र ग्रामीण भागात प्रकाशित होत असेल, तर त्याचा वाचक कोणत्या वर्गातील आहे, त्याची गरज काय आहे हे लक्षात घेऊन विषय, भाषा, आशय, त्यांची अभिरुची इत्यादींचा विचार करून लेखन केले तरच ते वाचकांना आकर्षित करू शकते. वाचकांची अभिरुची कळणे गरजेचे असते.

Sample Content

ii. **तात्कालिकता:** वृत्तलेखाचे नियोजन करताना तात्कालिकतेचा विचार करावा लागतो. वृत्तलेख हा विशिष्ट निमित्ताने लिहिला जातो. तात्कालिक कारणामुळे वाचक तो वृत्तलेख वाचतात. यासाठी त्याचे ताजेपण, समयोचितता साधली जाणे महत्त्वाचे असते.

iii. **वेगळेपण:** वाचकांची उत्सुकता, जिज्ञासा समजून घेऊन वृत्तलेखाचे वेगळेपण जपणे महत्त्वाचे असते. वृत्तलेखाच्या आराखड्याचा विचार करताना त्यातील वेगळेपण लक्षात घेण्याची गरज असते.

iv. **लक्षवेधकता:** वृत्तलेखात विषयाच्या आरंभापासून ते त्याच्या शेवटापर्यंत वाचकांची उत्सुकता टिकली पाहिजे. यासाठी वृत्तलेख लिहिताना एक आराखडा तयार करावा लागतो. त्यात वृत्तलेखाचा विषय, त्याची मध्यवर्ती कल्पना, शीर्षक, पोटशीर्षक, विवेचन, चित्रे, तक्ता, आलेख, नकाशा, छायाचित्रे या सर्वांचा विचार करावा लागतो. लागणारी चित्रे / फोटो कुठे उपलब्ध होणार आहेत, कोणाकडून चित्रे काढून घ्यायची आहेत हा विचारदेखील करावा लागतो. वृत्तलेखाचा मजकूर जितका उत्तम हवा, तितकीच त्याची चित्रेदेखील समर्पक व चांगली असावी लागतात, कारण एक चित्र हजार शब्दांचे काम करते. त्या अर्थाने वृत्तलेखाची उंची वाढवण्याचे काम समर्पक चित्रे करत असतात. या संबंधीचे नियोजन केले आणि त्यासाठी कच्चे टिपण, संदर्भ तयार करून ठेवले, तर वृत्तलेख लिहिणे सुलभ होते.

v. **वृत्तलेखाची शैली:** वृत्तलेखाचा प्रारंभीचा भाग बातमीसारखा असतो. वृत्तलेखाच्या पहिल्या भागात बातमीचा उलगडा झाला पाहिजे. 'कशावरती' आणि 'का' या संदर्भातील वाचकांच्या जिज्ञासेची पूर्ती प्रारंभीच्या भागात व्हायला हवी. यानंतर मधल्या भागात विवेचनाला संधी असते. अखेरच्या भागात समारोप करताना या वृत्तलेखातून काय अपेक्षित आहे, काय बदल घडावा असे वाटते, याचा विचार करावा लागतो. त्यामुळे, वृत्तलेख लिहिताना भाषा सरळ, साधी व मनाला थेट भिडणारी असावी. विवेचनात शब्दबंबाळपणा टाळावा. भाषा जड, समजण्यास कठीण असू नये. प्रदीर्घ वाक्ये नसावीत. छोटी छोटी वाक्ये असतील, तर वाचकांना विषय समजून घेणे सोपे जाते. वृत्तलेखांतून वाचकांची विषयासंबंधीची जिज्ञासा शमली गेली पाहिजे. (५ गुण)

(३) जाहिरात कला ही फार पूर्वीपासून जनमानसांत आपली मुळे घट्ट रोवून उभी आहे. आपल्याकडील एखादी गोष्ट इतरांनी घ्यावी आणि आपल्याला दुसऱ्याकडची एखादी गोष्ट घेण्याची इच्छा निर्माण व्हावी या मानवी भावनांमधूनच जाहिरातकला जन्मास आली. देश-विदेशांतील ग्राहकांपर्यंत पोहोचून त्यांच्यात आपले उत्पादन विकत घ्यावे अशी इच्छा निर्माण करावी हे जाहिरात क्षेत्राचे उद्दिष्ट असते. जाहिरात या शब्दाचा विचार करता लोकांचे लक्ष वेधून घेणारी ती 'जाहिरात' असा अर्थ निघतो.

Sample Content

माहितीपत्रक हेदेखील वैशिष्ट्यपूर्ण माहिती देणारे परिचयात्मक पत्रक असते. माहितीपत्रांतून विविध उत्पादने, सेवा आणि संस्था यांची माहिती आपल्याला मिळते. ही माहितीपत्रके म्हणजे नवनव्या योजनांकडे, उत्पादनांकडे, संस्थांकडे लोकांनी डोकावून पाहावे यासाठीची खिडकी आहेत. नवीन ग्राहक मिळवण्याची, नवीन बाजारपेठ काबीज करण्याची ती पहिली पायरी आहे. माहितीपत्रकातून एखाद्या उत्पादनाचा तपशील घरबसल्या, लिखित स्वरूपात मिळवता येऊ शकतो. शिवाय, जाहिरातींप्रमाणेच अचूकता, आटोपशीरपणा, संक्षिप्तता, आकर्षकता, वेगळेपणा, मजकुरातील रोचकता, आकर्षक मांडणी, आकर्षक भाषाशैली इत्यादी वैशिष्ट्ये माहितीपत्रकाचीही असतात. म्हणूनच, माहितीपत्रक ही अप्रत्यक्षपणे जाहिरातच असते. (५ गुण)

(४) विविध प्रकारच्या मुलाखतींनी आपले वर्तमान जीवन अंतर्बाह्य व्यापून टाकले आहे. व्यक्ती-व्यक्तींमधील 'माणसाचा वेध घेणाऱ्या', अंतर्मुख व्हायला लावणाऱ्या आशयसंपन्न, विचारगर्भ आणि रंगतदार मुलाखतींनी समाजाचे उन्नयन होत असते. उत्तुंग व्यक्तिमत्त्व लाभलेल्या व्यक्तीबद्दल प्रत्येकाच्या मनात आदर व कुतूहल असते. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल, मिळवलेल्या यशाबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता जनसामान्यांच्या मनात असते. अशा आदर्श व्यक्तींच्या जीवनाचे पदर आपल्याला उलगडून पाहायचे असतात. केवळ त्यांच्या यशाचे गमकच जाणून घ्यायचे असते असे नाही, तर त्यांची जीवनसंघर्षयात्रा समजून घ्यायची असते. कर्तृत्ववान व्यक्तीच्या 'आत दडलेल्या माणसाचा' शोध घ्यायचा असतो. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीला ते पैलू उलगडून दाखवणे जमतेच असे नाही. अशा व्यक्तींच्या मुलाखतीच्या वेळी हे पैलू त्यांच्याकडून काढून घेण्याकरिता त्या उमेदवाराची नस जाणावी लागते. त्याला जितके आतून जाणता येईल तितकी त्याची मुलाखत दिलखुलास, मनमोकळी होते. त्यांचा कोणता पैलू उलगडण्यासाठी कोणता प्रश्न विचारावा हे निश्चित करण्यासाठी त्या व्यक्तीचा स्वभावधर्म जाणणे महत्त्वाचे ठरते. त्याद्वारे त्याच्या सोबतचा संवाद खुलवता येतो व इष्ट उद्दिष्टे साध्य करता येतात. उदा. अभिनेता सुमीत राघवन याला केवळ एक कलाकार म्हणून न पाहता एक माणूस म्हणून जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या या यशस्वी प्रवासातील टप्पे, प्रेरणा जाणता येतील. त्याच्यातील माणूसपण जपणाऱ्या एका हसतमुख, आनंदी व्यक्तीला या मुलाखतीतून गाठता येईल.

अशारीतीने, उमेदवार आतून जाणून घेणे हे अत्यंत गरजेचे आहे. त्यातूनच त्याच्या असामान्यत्वाची ओळख पटते. (५ गुण)

Sample Content

## विभाग ५ – व्याकरण व लेखन [२०]

**कृती ५. (अ)**

(१) तुम्ही माझ्यासाठी अनोळखी आहात. (१ गुण)

(२) निरोगी राहावे असे सर्वांनाच वाटते. (१ गुण)

(३) (य) कर्मधारय समास (१ गुण)

(र) काळा किंवा गोरा (१ गुण)

(४) (य) कर्मणी प्रयोग (१ गुण)

(र) तो रडला. (१ गुण)

(५) (य) अतिशयोक्ती अलंकार (१ गुण)

(र) चरण (१ गुण)

(६) (य) हात देणे – **मदत करणे** (१ गुण)

(र) विलासरावांनी गरीब राजूच्या शिक्षणाकरिता **हात दिला.** (१ गुण)

**(आ)**

(१) **शाळेचे आत्मवृत्त**

आलास का रे बाळा आणि बाकीचे कुठे आहेत रे? अरे, मी तुमची शाळा. तुमची वाट बघून माझे डोळे शिणले. कोरोनामुळे बंद पडलेली शाळा सुरू होणार समजले आणि तुम्ही येणार म्हणून मला आकाशच ठेंगणे झाले. तुमचा आवाज ऐकण्यासाठी माझे कान आसुसले होते.

या कोरोनाच्या काळात तुमची शाळा मोबाइलवर भरत होती असे समजले. मोबाइलवरची कसली रे शाळा? आभासी सगळे. शाळेत आल्यावर ज्या काही गमती जमती तुम्ही करता, त्या तिथे कशा करणार? तुम्ही नाही, तर कित्येक दिवसांत प्रार्थना नाही, राष्ट्रगीत नाही, की तुमच्या मोठमोठ्या आवाजातील कविता नाहीत. शिक्षक तुम्हांला शिकवतात त्यावेळी मीदेखील खूप काही शिकत असते. तुमचे वेगवेगळे कार्यक्रम, स्पर्धा, क्रीडामहोत्सव, स्नेहसंमेलन, त्यातील तुमचा उत्साह बघून मलादेखील खूप आनंद होतो. तुम्ही एखादी स्पर्धा जिंकून माझे नाव मोठे करता. त्यावेळी खरोखर ऊर भरून येतो.

Sample Content

दहावीच्या परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालात, की असे वाटते तुम्हांला मिठीच मारावी.

मला तो दिवस नेहमीच आठवतो ज्या दिवशी तुम्ही रडत रडत पहिल्यांदा शाळेत येता. त्यावेळी मी हसत असते; पण दहावीच्या निरोप समारंभानंतर जेव्हा रडत रडत बाहेर पडताना तुम्हांला पाहते तेव्हा मात्र मीसुद्‌धा रडत असते. गेली पन्नास वर्षे मी येथे उभी आहे. अनेक पिढ्या शिक्षण घेऊन गेल्या. स्वतःचे नाव मोठे केले. माझे नाव मोठे केले. अनेक डॉक्टर, इंजिनिअर, कलाकार, अनेक क्षेत्रांतील नामांकित लोक माझ्याकडे शिकून गेले याचा मला सार्थ अभिमान आहे.

तुमच्या आयुष्यात जसे माझे स्थान महत्त्वाचे आहे, तसेच माझे जीवन तुमच्याशिवाय अपूर्ण आहे. मला तुमच्याविषयी काही तक्रार करायची नाही; पण काही खोडकर मुले माझ्या भिंतीवर चित्रे काढतात, नावे लिहितात याचे मला दुःख होते. शाळेच्या वस्तू निष्काळजीपणाने वापरतात तेव्हा खरंच यातना होतात. शाळेचे माजी विद्यार्थी कधीतरी भेट द्यायला यावेत, माझी काळजी घेण्यासाठी काही प्रयत्न करावेत असे मला नेहमीच वाटते. तुमचा आणि माझा ऋणानुबंध केवळ काही वर्षांचा नाही. आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर तुम्हांला शाळा कोणती विचारल्यावर तुम्ही माझे नाव घेता ना? आपले नाते हे असेच राहणार आहे. तुमचे आयुष्य घडवण्यात माझा महत्त्वाचा सहभाग आहे याचा मला अभिमान आहे. तुम्ही आता हळूहळू रोज शाळेत याल आणि मला तुमचा सहवास लाभेल ह्याचाच मला आनंद आहे. (१० गुण)

**किंवा**

(२) **वाचन : एक उत्तम छंद**

'असा धरी छंद। जाई तुटोनिया भावबंध।'

संतमहात्म्यांच्या या शिकवणीप्रमाणे आपण कुठला ना कुठला तरी छंद जोपासायलाच हवा. छंद जोपासल्याने आपल्याला रोजच्या धकाधकीच्या, चाकोरीबद्‌ध जीवनाचा कंटाळा येत नाही. कुणाला पोस्टाची तिकिटे, जुनी नाणी जमवण्याचा छंद असतो, कुणाला गाण्याचा, तर कुणाला चित्र रेखाटण्याचा छंद असतो. प्रत्येक जण आपल्या या छंदातून मनमुराद आनंद लुटत असतो.

अशा या अनेक छंदांपैकी 'वाचन' हा एक उपयुक्त व उत्तम असा छंद आहे. वाचनाचा छंद आपण इतरांना त्रास न देता जोपासू शकतो. हा छंद खूप खर्चिकही नाही. दिवाळीमध्ये महाराष्ट्रात दिवाळी अंक शेकडोंच्या घरात प्रसिद्‌ध होऊन त्याची वाचकांना जणू मेजवाणीच मिळत असते. सुट्ट्यांच्या काळात ठिकठिकाणी भव्य पुस्तक प्रदर्शने आजही भरतात व वाचकांचा त्याला प्रचंड प्रतिसादही मिळतो.

वाचनाचा छंद केवळ आपली ज्ञानाचीच भूक भागवत नाही, तर मन प्रसन्न करणारे, उत्साही करणारे असे मनोरंजनही करते. दूरच्या प्रवासातील कंटाळवाणा रिकामा वेळ वाचनाच्या छंदामुळे सुखकारक ठरतो. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या थोर देशभक्तांना, क्रांतिकारकांना जेव्हा कारावास भोगावा लागला,

Sample Content

तेव्हा त्यांनी ब्रिटिश सरकारला पुस्तके उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली. वाचनाच्या या छंदाने त्यांची ज्ञानाची भूक भागून या कठीण प्रवासात पुस्तकांनी त्यांची साथ केली. अशाप्रकारे, दुःखाच्या प्रसंगी, एकटे असताना, प्रवासात पुस्तके आपली साथ करतात. कदाचित मित्र कंटाळतील, एक वेळ आई-वडीलही थकतील; पण पुस्तके कधी कंटाळा करत नाही, की थकतही नाही. आपल्याला कशीही, कुठेही हवी तेव्हा, हवी तिथे साथ करायला ती सदैव तयारच असतात.

उत्तम पुस्तकाच्या वाचनात आपण आपल्या चिंता काही वेळ का होईना, पण विसरतो. उत्तम पुस्तकांच्या वाचनाने मिळणारा आनंद उच्च दर्जाचा असतो. सतत उत्तमोत्तम वाचन केल्याने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन व्यक्ती बहुश्रुत होते.

वाचनाच्या छंदामुळे आपल्या जीवनात येणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्यास प्रेरणा मिळते. उदा. 'वीणा गवाणकर' अनुवादित 'एक होता कार्व्हर' 'विठ्ठल कामत' यांचे 'इडली ऑर्कीड आणि मी' ही आणि इतर पुस्तके आयुष्यातील अडचणींवर मात करत पुढे प्रगतिपथावर जाण्यास प्रेरणाच देतात. 'शिवाजी सावंत' यांची 'मृत्युंजय' 'युगंधर' ह्या पुस्तकातून हजारो वर्षांपूर्वीच्या प्राचीन ऐतिहासिक, पौराणिक काळाचे वर्णन वाचताना त्या कालखंडात फिरून आल्याचा अनुभव मिळतो. त्या काळातील रीतिरिवाज, खान-पान, परंपरा, व्यापार उदीम, शिष्टाचार इत्यादी घटकांची माहिती मिळते. त्यामुळे, वाचनाच्या छंदातून केवळ ज्ञान न मिळता भूतकाळातील कालखंडाची भ्रमंती केल्याचासुद्धा अनुभव प्राप्त होतो.

आजवर जगात होऊन गेलेल्या थोर विचारवंत, बुद्धिजीवी व्यक्तींनी तर आपल्या वाचनाच्या छंदाबद्दल भरभरून लिहिले आहे. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ 'जयंत नारळीकर' यांनी 'माझा छंद माझा आनंद' या लेखात आपण पुस्तकाच्या वाचनासाठी कसे प्रयत्न केले व शेवटी ते पुस्तक मिळाल्यावर झालेल्या आनंदाचा अनुभव किती और होता, हे आवर्जून सांगितले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांच्या वाचनाच्या छंदाबाबत सर्वांनाच ठाऊक आहे. सलग तासन् तास ग्रंथालयात बसून वाचनाचा आनंद ते घेत असत. 'वाचाल तर वाचाल' असा अनमोल संदेश त्यांनी आपणां सर्वांना दिला.

आपल्या मराठी भाषेत उत्कृष्ट दर्जाची साहित्य निर्मिती विविध साहित्य प्रकारांतून झालेली दिसते. आध्यात्मिक ग्रंथ वाचनाने मनाला उभारी येते. उत्तम अभंग, काव्य वाचनाने रसिकता हा गुण वाढीस लागतो, ललित साहित्याच्या वाचनामुळे आपणांस अनुभवांच्या पुनःप्रत्ययाचा आनंद घेता येतो. वाचनामुळेच माणसाची विचारशक्ती, कल्पनाशक्ती, संवेदनशक्ती अशा शक्तींचा विकास होतो. म्हणून, जीवनाच्या सर्व अंगाचे दर्शन घडवणारा व मनावर संस्कार करणारा वाचनाचा आनंद हा नक्कीच श्रेष्ठ आनंद आहे.

(१० गुण)

Sample Content

किंवा

(३) **मी पोलीस झालो तर...**

काल आय.पी.एस. विश्वास नांगरे पाटील यांचे भाषण ऐकले आणि मनात विचार डोकावला... मी पोलीस झालो तर... काय गंमत येईल ना! जी वर्दी पाहून साऱ्या भामट्यांची गाळण उडते ती वर्दी माझ्या अंगावर चढेल. ती घालून रुबाबाने मी माझ्या परिसरात मिरवेन. आजूबाजूचे लोक माझ्याशी बिचकून वागतील. जाता-येता मला सलाम ठोकतील. कोणीही मला कसलाच त्रास देणार नाही; पण... पण पोलिसी वर्दी आपल्यासोबत देशरक्षण, शांतता रक्षण, समाजहित रक्षण यांची फार मोठी जबाबदारी घेऊन येते, ही गोष्ट विसरून चालणार नाही. ती जबाबदारी जाणून त्यानुसार वर्तन करण्याचा मी प्रयत्न करेन.

मी पोलिस झालो, तर देशरक्षणासाठी २४ तास सज्ज राहीन. चौकस बुद्धीने समाजात वावरेन. कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी मी प्राणांची बाजी लावेन. समाजहित हेच ध्येय समोर ठेवून मी माझे काम प्रामाणिकपणे करत राहीन.

कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन समाजघातक कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना शिताफीने जेरबंद करेन. त्यांना योग्य ती शिक्षा मिळावी यासाठी मी प्रयत्नशील राहीन. चोऱ्या, दरोडे, फसवणूक होऊ नये याकरिता मी सतत गस्त घालेन. समाजात वावरताना आजूबाजूला बारीक लक्ष ठेवेन. त्यामुळे, चुकीच्या कामांना, अपराधांना खीळ बसेल. गुन्हेगारांना पकडण्यासाठी प्रसंगी वेशांतर करून, सापळा रचून त्यांना कायद्याचा बडगा दाखवेन.

समाजमाध्यमांद्वारे जनतेशी संवाद साधून फसवणुकीपासून सावध राहण्याचा सल्ला मी देईन. सायबर गुन्हेगारांना पकडण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानचा वापर करेन. आपला देश उत्सवांचा देश आहे. त्यामुळे, दसरा, दिवाळी, ईद, ख्रिसमस अशा अनेकाविध सणांमध्ये जेव्हा लोक एकत्र येतात तेव्हा स्वतःचे कुटुंब बाजूला सारत मी बंदोबस्तासाठी तत्पर राहीन. काही अघटित घडू नये याकरिता मी सतत दक्ष राहीन. अनेक लोक वाहतुकीचे नियम मोडताना सर्रास पाहायला मिळतात. अशांवर आधुनिक सी.सी.टिव्ही कॅमेरांतून नजर ठेवून योग्य ती कारवाई करण्यास मी तयार राहीन. या कॅमेऱ्यांचा उपयोग करून गुन्हेगारीला आळा बसवण्याचा प्रयत्न मी करेन.

सैनिक ज्याप्रमाणे देशाच्या सीमेवर राहून देशाबाहेरील शत्रूशी सामना करतात त्याप्रमाणे देशांतर्गत शत्रूंपासून माझ्या देशातील जनतेला मुक्त करण्याचा मी प्रयत्न करेन. गुन्हेगारांची, कायदा मोडणाऱ्यांची, समाजकंटकांची मी हयगय करणार नाही.

माझे खाते भ्रष्टाचारासाठी ओळखले जाते. या दलदलातून मी स्वतःला लांब ठेवेन. भ्रष्ट पोलिसांना पकडून देऊन मी माझे कर्तव्य बजावेन. माझे काम हे देशसेवा, देशवासियांची सेवा करणे, कायदा

सुव्यवस्था टिकवणे हे आहे. ते मी ईमानदारीने निभावेन. माझ्या वर्दीवर मी कोणताही डाग लागू देणार नाही. माझ्यामुळे माझ्या खात्याचे नाव उज्ज्वल होईल यासाठी मी सतत झटेन. मी पोलीस झालो तर... एक प्रामाणिक पोलीस बनून समाजाचे रक्षण करेन. (१० गुण)

**किंवा**

(४) **मी पाहिलेला अपघात**

जूनचा पहिला आठवडा होता. कॉलेज लवकरच सुरू होणार होतं. त्यासाठी खरेदी करण्याकरिता बाबा मला मुंबईत घेऊन गेले होते. परतीच्या प्रवासावेळी पावसाने आपली हजेरी लावली. जोराच्या झपाट्याने साऱ्यांचा गोंधळ उडवून दिला. यात दुचाकी स्वारांचा जास्त गोंधळ उडाला. जो-तो आपल्या मोटार सायकली पळवत होते. अचानक आलेल्या पावसात भिजू नये, यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करत होता. मी बसमध्ये बसून ही सारी गंमत पाहत होते. भिजायची भीती नसल्याने आमची बस निवांत चालत होती.

आमची बस मोठ्या पुलावर आली आणि अचानक एक मोटारसायकल सरकली आणि मोटारसायकल स्वार गाडीवरून खाली पडला. मागच्या गाड्यांनी तत्काळ ब्रेक दाबत गाड्या नियंत्रणात आणल्या; पण एक विचित्र अपघात येथे पाहायला मिळाला. त्या पुलावरून येणारी प्रत्येक मोटारासायकल अशीच सरकू लागली. लागोपाठ १७ मोटार सायकल सरकून अपघातग्रस्त झाल्या. सर्वच मोटारसायकल स्वारांना दुखापत झाली होती. काहींना गंभीर दुखापतीही झाल्या होत्या. अनेकांनी पुलावर गाड्या थांबवून, खाली उतरुन दुचाकी स्वारांना थांबवण्याचे प्रयत्न सुरु केले होते; पण अट्टहासाने पुढे सरकणाऱ्या दुचाकींच्या अपघाताची मालिका सुरूच होती.

पहिल्या पावसामुळे रस्त्यावर गळती झालेले क्रूड ऑईल वर आले होते. त्यामुळे, दुचाकींवर नियंत्रण ठेवणे अशक्य झाले होते. वाहतूक नियंत्रणकक्षात फोन लावून काहींनी यासंदर्भातील माहिती कळवली. सगळा थरार आम्ही अनुभवत होतो. अपघातामुळे झालेल्या वाहतूककोंडीत अडकलेल्या आमच्या बसमधून हा नजारा आम्हांला पाहायला मिळत होता.

शेवटी वाहतूक नियंत्रणकक्षातून काही माणसं तातडीने अपघातस्थळी पोहोचली. त्यांनी मातीचा सडा संपूर्ण पुलावर पसरला. त्यामुळे, अपघातांची मालिका थांबली. तातडीने रुग्णवाहिका बोलावून जखमींना रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले. वाहतूक पोलिसांनी वाहतूककोंडी सोडवत आम्हांला रस्ता मोकळा करून दिला. विचित्र पद्धतीने झालेला हा अपघात मला कायम लक्षात राहील असा होता. त्याचा थरार मनाला अजूनही हेलावून जातो. (१० गुण)

Sample Content

**किंवा**

(५) **माझे आवडते व्यक्तिमत्त्व**

डोळ्यांत येणाऱ्या अश्रुंना वाट न देणारी, चेहऱ्यावर प्रेम न दाखवता, मनापासून माया करणारी, जबाबदारीचे ओझे खांद्यावर समर्थपणे पेलणारी, कठीण परिस्थितीतही खंबीर होऊन साऱ्यांचा आधार बनणारी व्यक्ती म्हणजे बाबा.

माझा बाबा... माझ्यासाठी माझ्या आयुष्यातला नायक आहे. जो कधीच कुठल्याच परिस्थितीत हार मानत नाही. माझा बाबा कितीही वाईट परिस्थिती ओढावली तरी खचत नाही. तो लढतो आणि त्यातून बाहेरही पडतो. तो नेहमीच जिंकतो, कारण हार मानणं त्याच्या रक्तातच नाही.

माझा बाबा माझ्यावर सगळ्यांत जास्त प्रेम करतो. त्याचं व्यक्त होणं बऱ्याच वेळा राहून जातं; पण न बोलताही, न दाखवताही तो माझ्याप्रतिची प्रत्येक जबाबदारी दक्षपणे पार पाडून माझ्याबाबतची त्याची चिंता दर्शवतो.

माझा बाबा मनाने खूप कणखर आहे. खचणं त्याला माहीतच नाही. संकटं येतात तेव्हा तो गोंधळून जात नाही. तो शांत राहतो. विचार करतो. घाई न करता थोडा वेळ घेऊन निर्णय घेतो. विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयांमुळे तो संकटांवर सहज मात करतो.

बाबा माझ्या कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. तो उत्तम मुलगा, उत्तम नवरा आणि उत्तम बाबाही आहे. या साऱ्या भूमिका तो शिताफीने हाताळतो. नोकरी करताना येणारी आव्हाने तो लीलया पेलतो. कधी कामाचा ताण असेल तरी तो घरी चिडचिड करत नाही. त्याला शक्य होईल तेवढा वेळ तो आम्हां कुटुंबियांसाठी, खासकरून माझ्यासाठी काढतो.

माझा बाबा पुरुषकेंद्री विचारांचा नाही. तो फार मोकळा आहे. त्याच्या डोक्यात विचारांची गुंतागुंत नसते. तो ज्या ऐटीने बाहेरची कामे सांभाळतो तेवढ्याच शिताफीने आईला मदतही करतो. माझा बाबा उत्तम स्वयंपाक बनवतो. माझी आईही नोकरी करत असल्याने तिच्या खांद्याला खांदा लावून तो घराची आघाडीही सांभाळतो.

माझा बाबा कधी कुठल्या गोष्टीचा ताण घेत नाही. आपल्याला आयुष्य एकदाच मिळते. ते आनंदाने जगावं असं त्याचं स्पष्ट मत आहे. तो मला नेहमी सांगतो, "बाळा, आयुष्यात पुढे काय बनायचंय ते तू ठरव; पण अंतिमतः तुला आयुष्यात आनंदी बनायचंय हे विसरू नकोस." त्यांच्या या विचारांनी मी नेहमी प्रेरित होतो. जीवनाचं गमक त्यांना जणू लक्षात आलं आहे.

माझा बाबा आपल्या कुटुंबासाठी वेळ तर देतोच शिवाय काही वेळ तो समाजसेवेसाठीही काढतो. त्यातून मिळणारे समाधान त्याच्या चेहऱ्यावर नेहमी झळकते. नियोजनबद्ध कामाची अट मात्र तो नेहमी

Sample Content

पाळतो. कामाचे योग्य नियोजन करून ते वेळेत पूर्ण करणे ही आपली जबाबदारी आहे, हे तो जाणतो आणि मानतोही. शनिवार, रविवारच्या सुट्टीत माझा बाबा मला घेऊन ट्रेकिंगला किंवा फिरायला जातो. त्यावेळी तो माझा केवळ जवळचा मित्र असतो. मी बाबाजवळ जेवढा मोकळा आहे तेवढा कोणाजवळच नाही.

असा माझा बाबा माझा मित्र, मार्गदर्शक, माझे प्रेरणास्थान आहे. मला पुढे त्याच्यासारखं बनायला आवडेल. (१० गुण)

Sample Content

# AVAILABLE BOOKS FOR COMPETITIVE EXAMINATIONS

## For NEET-UG & JEE (Main) Exam

### ABSOLUTE SERIES
- Physics Vol - I & II
- Chemistry Vol - 1.1 & 1.2
- Chemistry Vol - 2.1 & 2.2
- Mathematics Vol - I & II
- Biology Vol - I & II

### CHALLENGER SERIES
- Physics Vol - I & II
- Chemistry Vol - I & II
- Mathematics Vol - I & II
- Biology Vol - I & II

### PSP SERIES
(PREVIOUS SOLVED PAPERS)
- Physics
- Chemistry
- Biology

### NEET-UG TEST SERIES
- Physics
- Chemistry
- Biology

### ADDITIONAL BOOKS
- NEET-UG 10 Mock Tests With Answer Key & Hints
- Previous 11 Years NEET Solved Papers With Solutions
- JEE MAIN Numerical Value Type Questions (NVT)

## For MHT-CET Exam

### STD. XI & XII TRIUMPH SERIES
- Physics
- Chemistry
- Mathematics
- Biology

### STD. XI TRIUMPH SERIES
- Physics
- Chemistry
- Mathematics
- Biology

### STD. XII TRIUMPH SERIES
- Physics
- Chemistry
- Mathematics
- Biology

### SOLUTIONS TO MCQs
- Physics Solutions to MCQs
- Chemistry Solutions to MCQs
- Mathematics Solutions to MCQs
- Biology Solutions to MCQs

### MHT-CET TEST SERIES
- Physics With Answer Key & Solutions
- Chemistry With Answer Key & Solutions
- Mathematics With Answer Key & Solutions
- Biology With Answer Key & Solutions

### PSP SERIES
(PREVIOUS SOLVED PAPERS)
- Physics
- Chemistry
- Mathematics
- Biology


### ADDITIONAL BOOKS
- MHT-CET PCB Solved Papers 2023
- MHT-CET PCM Solved Papers 2023
- MHT-CET 21 Model Question Papers (Physics, Chemistry, Biology)
- MHT-CET 21 Model Question Papers (Physics, Chemistry, Mathematics)

**Visit Our Website**


**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org


Explore our range of
**Std. XII Question Bank Books**